म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३०८६

' ... मायनारिटीज'
या मूळ इंग्रजी ग्रंथाचा मराठी अनुवाद

# संस्थाने आणि अल्पसंख्य समाज

ले... ...ासाहेब आंबेडकर
...ुवाद • वसंत मून

REFBK-0025739

संदर्भ निबंध
३२८६
२५७३९
२२१७म८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

13 NOV 1993

( क्र. मा. पहा )
५०००–११–८६

REFBK-0025739

# संस्थाने आणि अल्पसंख्य समाज

मूळ इंग्रजीचा मराठी अनुवाद

लेखक :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

अनुवाद :

वसंत मून

**प्रकाशक**
**अरविंद पाटकर**
मनोविकास प्रकाशन
आमदार निवास
मंत्रालयाशेजारी, चर्चगेट,
मुंबई-४०० ०३२

प्रकाशन काळ :
१५ ऑगष्ट १९८८

सर्व अधिकार
सौ. मीनाक्षी मून

किंमत पंधरा रुपये

**मुद्रक**
**अशोक सा. फलदेसाई**
क्रिएटिव्ह प्रिंटस्
क्रिएटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट.
मुंबई-४०० ०११

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२८९
दा. क्र. २५७३९
२५।७।१८
(स्थळ प्रत)

# संस्थाने आणि अल्पसंख्य समाज

संस्थाने आणि अल्पसंख्य समाज – त्यांचे अधिकार काय, आणि स्वतंत्र भारताच्या संविधानात ते कसे प्राप्त करता येतील.

शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनतर्फे घटनासमितीस सादर केलेला अस्पृश्यांच्या हितसंरक्षक तरतुदींचा खलिता.

लेखक :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

अनुवाद :
वसंत मून

# समर्पण

हरी रामजी पाटील.

एक दिवस बोट धरून त्यांनी मला सोबत नेले नागपूरच्या नामांकित पटवर्धन शाळेत माझे नाव घातले व माझ्या शिक्षणाची धुरा त्यांनी उचलली.

उंच गोरापान बांधा, जाडे-भरडे पांढरे शुभ्र धोतर व पांढराच सदरा. अधूनमधून कोट, अशी साधी राहणी.

सुपारीची देखील सवय नसलेले हरीमामा हळूच हसायचे नि मोजकेच बोलायचे. त्यांच्या नजरेत वात्सल्य नि वचक यांचे अजब मिश्रण होते. त्यांच्या वागण्यात एक जरब होती. १९२०-२५ चे दरम्यान शालेय जीवनात वर्गात पहिला नंबर पटकावल्याबद्दल त्यांना मिळालेली पुस्तके आमच्या आदराचे स्थान होते. त्यांच्या राहणीत एक वक्तशीरपणा आणि शिस्त होती.

उत्तरायुष्यात हत्तीपायाच्या व्याधीने ते जर्जर झाले. शासकीय नोकरीत त्यांचा आर्थिक छळ करण्यात आला तरीही त्यांचा स्वाभिमान किंचितही वाकला नाही नि कुणाहि समोर त्यांनी हात पसरला नाही.

माझ्या घडणीत हरीमामांचा फार मोठा वाटा आहे. त्यांच्या स्मृतीस सादर समर्पण।

वसंत मून

# अनुवादकाचे दोन शब्द

बाबासाहेब आंबेडकरांच्या 'स्टेटस ॲन्ड मायनॉरिटीज'' या पुस्तकाचे ''संस्थाने आणि अल्पसंख्य समाज'' या नावाने हे सरळ भाषांतर आहे. मूळ इंग्रजी निवेदन बाबासाहेबांनी घटनासमितीला सादर केले. ''फ्रेमिंग ऑफ इंडियाज कान्स्टीट्यूशन'' या ग्रंथाच्या पृष्ठ ८४ ते ११४ पानांवर ते छापून आलेले आहे. बाबासाहेबांनी ''प्राक्कथना''सह हे निवेदन पुस्तकरूपाने मार्च १९४७ मध्ये प्रसिध्द केले होते. तोपर्यंत संस्थानांचा विचार करणाऱ्या समितीचे गठन करण्यात आले होते.परंतु बाबासाहेबांना त्या समितीवर घेण्यात आले नव्हते.

संस्थाने आणि अल्पसंख्य समाज'' हे मराठी नामकरण अनेक मित्रांना आवडले नाही. नागपूरचे श्री. मा. फ. गांजरे यांनी ''राज्ये'' हा शब्द ''स्टेट्स'' या शब्दाचा प्रतिशब्द ''राज्ये'' असाच हवा. आज सर्वत्र ''स्टेट''चा अर्थ ''राज्य'' म्हणूनच प्रचलित आहे. या अनुवादात ''स्टेट्स'' म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात अस्तित्वात असलेली ''संस्थाने'' असा अर्थ केलेला आहे. याबद्दल थोडा खुलासा करणे अनाठायी ठरणार नाही.

स्वातंत्र्यापूर्वी भारताच्या घटक राज्यांना ''प्रांत''– ही संज्ञा होती. त्यांना ''ब्रिटीश प्रॉव्हिन्सेस' असे इंग्रजीत म्हणत. या प्रांताव्यतिरिक्त त्याकाळी सुमारे ६००चे वर संस्थाने होती. या संस्थानांना इंग्रजीत ''स्टेट्स'' म्हणत असत. उदाहरणार्थ ''स्टेट ऑफ जम्मू ॲन्ड कश्मिर'', ''ग्वाल्हेर स्टेट'', ''बडोदा स्टेट'', वगैरे. या ''संस्थानां''चे राजे, महाराजे होते. ते आपल्या राज्यांतर्गत स्वतंत्र होते. त्यांचे अंतर्गत कायदे वेगळे होते. या संस्थानांना स्वतंत्र भारतात विलीन करण्याचा प्रश्न वर्तुळ परिषदेच्या पूर्वीपासून चर्चिला जात होता. वर्तुळ परिषदेत संस्थानिकांचे प्रतिनिधी म्हणून सर तेजबहाद्दूर सप्रू, सर सुलतान अहमद, आदि लोकांनी त्यांची बाजू मांडली होती.

बाबासाहेब आंबेडकर संस्थानिकांच्या प्रश्नात सुरवातीपासून बारकाईने लक्ष घालीत होते. या संस्थानिकांचे राजे, महाराजे, सरदार, जहांगीरदार या लोकांचे इंग्लंडातील राजघराण्यांशी व उच्च राजकीय नेते व पदाधिकाऱ्यांशी निकटचे संबंध प्रस्थापित झाले होते. भारतात आपले वेगळे अस्तित्व ठेवण्याची त्यांची सतत धडपड सुरू होती.

दुसऱ्या गोलमेज परिषदेत हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. फेडरल स्ट्रकवर कमेटीसमोर दिनांक १५ सप्टेंबर १९३१ रोजी आपले पहिलेच भाषण देताना प्रतिनिधित्व करतात कारण आजतागायत राजेलोकांच्या अंतर्गत व घरगुती कारभारात त्यांनी कधीही हस्तक्षेप केलेला नाही.

त्याच दिवशी बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व प्रतिनिधींना तेथेच खडसावून बजावले होते की, ''राजे लोकांना ही समिती डोळे मिटून काहीही देणार नाही हे त्यांनी

लक्षात असू द्यावे". आपला मुद्दा स्पष्ट करताना ते पुढे म्हणाले की, "संघराज्यात समाविष्ट करवून घेण्यापूर्वी, संस्थानाला हे सिध्द करावे लागेल की त्या संस्थानाजवळ त्याच्या नागरिकांना सुसंस्कृत जीवन देण्याकरिता पुरेशी साधने व सामर्थ्य आहे की नाही. तसेच विधानमंडळावर येणारा संस्थानाचा प्रतिनिधी हा निर्वाचित असावा, नेमणुकीतून आलेला नसावा." त्यांच्या मते, "नेमणुकीचे तत्व जबाबदार राज्यपध्दतीच्या पूर्णतः विरोधी आहे. कार्यकारिणीने विधानमंडळात सदस्य नेमावे आणि ते विधीमंडळ लोकप्रतिनिधींचे आहे असे जगाला दाखवावे ही जबाबदार राज्यपध्दतीची थट्टा होय".

संस्थानातील प्रजेची बाजू डॉक्टर साहेबांनी इतक्या प्रभावीपणे मांडली की या भाषणाने वर्तुळ परिषदेत एकदम खळबळ माजली. आणि बाबासाहेबांशी मित्रत्वाचे संबंध ठेवणाऱ्या राजे-महाराजांना देखील धक्का बसला. सर्व संस्थानांच्या प्रतिनिधींना, जमीनदार व भांडवलदारांना केंद्रीय विधानमंडळात नेमणुकीद्वारे प्रतिनिधीत्व हवे होते. त्यांचे प्रतिनिधी सर सुलतान अहमद आणि गेव्हिन जोन्स यांनी संस्थानांचे प्रतिनिधी नेमणुकीद्वारेच पाठविण्यात यावे म्हणून आपली बाजू हिरीरीने मांडली आणि भारतीय जनतेचे प्रतिनिधी म्हणून गेलेले महात्मा गांधी यांनी देखील त्यांच्या मागणीला पाठींबा दिला. दुसऱ्या दिवशीच्या भाषणात म. गांधी स्पष्ट म्हणाले, "संस्थानांना त्यांनी अमुक करा वा तमुक करा, असे सांगण्याचा आपल्याला अधिकार नाही." यावरून संस्थानांतील प्रजेपेक्षा संस्थानिकांनाच कॉंग्रेसचा वरदहस्त होता हे लक्षात येईल.

फेडरल स्ट्रक्चर कमिटीत बरीच खडाजंगी झाली. संस्थानिक अडून बसले. अशा वेळी भारताला मिळणारे जबाबदार पध्दतीचे सरकार पुढे ढकलले जाते की काय अशी धास्ती बाबासाहेबांना वाटली. शेवटी ते म्हणाले, "भारताच्या संघराज्यात प्रविष्ट होण्यास संस्थानिक जोपर्यंत राजी होत नाहीत तो पर्यंत भारताचे संघराज्यात "जबाबदार शासन" स्थापन करण्याचे लोंबकळत ठेवावे असे कोणताही भारतीय म्हणणार नाही."

२४ डिसेंबर १९३२ रोजी वर्तुळ परिषदेवरून परतल्यानंतर डॉक्टरसाहेबांनी "टाइम्स ऑफ इंडिया"ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की "संस्थानिकांच्या विरोधाची पर्वा न करता ब्रिटीशांनी भारताला जबाबदार राज्यपध्दती सुपूर्द करावी."

या सर्व घटनांवरून भारतातील संस्थानिकांचे स्वातंत्र्यपूर्व काळात काय धोरण होते याची कल्पना येऊ शकेल. बाबासाहेब आंबेडकर हे संस्थानातील प्रजेला भारतीय जनतेसोबतच पारतंत्र्यावरून मुक्त करण्यासाठी झटत होते.

या पार्श्वभूमीवर"स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटीज" या खलित्याचा विचार व्हायला हवा. हे निवेदन संस्थानांचे विलीनीकरण होण्यापूर्वी घटना समितीला सादर केलेले आहे. या निवेदनाचे शीर्षक जरी बारकाईने वाचले तरी असे ध्यानात येईल की, "स्टेट्स" म्हणजे संस्थाने व "मायनॉरिटीज" म्हणजे अल्पसंख्यांक असलेले समाज, "या उभयतांच हक्क स्वतंत्र भारताच्या भावी संविधानात कसे प्राप्त करून घेता येतील" अथवा ते कसे असावेत या संबंधीचे विश्लेषण या शीर्षकात अंतर्भूत आहे.

बाबासाहेबांनी जी प्रस्तावना (प्रीफेस) मूळ इंग्रजी पुस्तिकेस दि. १५-३-४७

रोजी लिहिली तिचा अनुवाद या पुस्तकात आहेच. त्यात शेवटल्या परिच्छेदात जे लिहीले आहे ते महत्वाचे आहे. घटना समितीला भेडसावणारे दोन जटील प्रश्न म्हणजे अल्पसंख्यांकांचा प्रश्न व भारतीय संस्थानिकांचा प्रश्न हे होते. भारतीय संस्थानांचा प्रश्न त्यांना अतिशय जिव्हाळ्याचा व निकडीचा वाटत होता. संस्थानिकांचा प्रश्न सोडवण्याकरिता नेमलेल्या समितीवर त्यांना, इच्छा असूनही न नेमल्यामुळे बराच उद्वेगही वाटला व आपणास संधी मिळाली नाही म्हणून खंतही वाटली. शेवटल्या वाक्यातही त्यांनी, "संस्थानांच्या प्रश्नासोबत अल्पसंख्य, अस्पृश्य व अन्य नागरिकांच्या हक्काबद्दलचे विवेचन या निवेदनात समाविष्ट केले आहे" असे म्हटले आहे.

या पुस्तिकेतील आर्टिकल म्हणजे 'अनुच्छेद एक' हे पूर्णपणे संस्थानांच्या भारतीय संघराज्यातील प्रवेशासंबंधी लिहीलेले असून कोणत्या अटींवर त्यांना संघराज्यात प्रवेश देण्यात यावा याचे विश्लेषण करणारे आहे. संस्थानांसंबंधी १९३१ साली वर्तुळ परिषदेत त्यांनी मांडलेल्या विचारांनाच या निवेदनात कायद्याचे प्रारूप देण्यात आलेले आहे.

या पुस्तकात एकूण दोनच अनुच्छेद आहेत. पहिला अनुच्छेद भारतीय संस्थानांसंबंधी असून दुसऱ्या अनुच्छेदात मूलभूत अधिकार, अल्पसंख्यांकांचे व अस्पृश्यांचे हक्क व त्यांचे संरक्षण करण्याची योजना तसेच अस्पृश्यांकरिता स्वतंत्र वसाहती आणि सर्वोच्च शिक्षण आणि राज्य समाजवादाची योजना सुचविलेली आहे. दुसऱ्या अनुच्छेदाचे शेवटी चवथ्या पार्टमध्ये देखील संस्थानातील अस्पृश्यांच्या संरक्षणाकरिता उपाय सुचविले आहेत.

वरील सर्व विवेचनातून "स्टेट्स" या शब्दाचा या पुस्तकातील अर्थ "भारतातील राज्ये" असा होत नसून तो "संस्थाने' असा आहे हे वाचकांच्या लक्षात येईल.

या पुस्तकाचा अनुवाद मी करावा असा बऱ्याच दिवसांपासून श्री. अरविंद पाटकर यांनी माझ्यामागे लकडा लावला होता. अन्य व्यापामुळे हे काम लवकर हाती घेणे शक्य झाले नाही. "रिडल्स"च्या वादंगात मला थोडी सवड मिळाली व त्यात हे काम मला घाईने का होईना, पूर्ण करता आले, याचा मला आनंद वाटतो.

हे निवेदन म्हणजे भारताच्या संभाव्य घटनेला संक्षिप्त आराखडाचा होता. त्यामुळे कायद्यातील तांत्रिक शब्दांशी फारसा परिचय नसलेल्या माझ्यासारख्या अनभिज्ञ व्यक्तीच्या अनुवादात काही चुका राहून गेल्यास त्याबद्दल आश्चर्य वाटायला नको. अनुवाद निर्दोष व्हावा म्हणून मी आपल्या परीने पराकाष्ठा केलेली आहे. मूळ पुस्तकातील प्रत्येक शब्द न् शब्द वारंवार तपासलेला आहे.

अनुवाद करताना बऱ्याच मर्यादा असतात याची वाचकांना कल्पना असेलच. इंग्रजीतील एकच वाक्य वेगवेगळ्या ४-५ प्रकाराने मराठीतून लिहीता येईल. संपूर्ण एकच परिच्छेद २-३ अनुवादकांना मराठीकरण करण्यास दिल्यास तो भिन्न प्रकारे लिहीला जाऊ शकतो. शिवाय असे अनेक इंग्रजी शब्द आहेत त्यांना शोधून देखील निश्चित मराठी प्रतिशब्द सापडणे कठीण जाते. मूळ लेखनातील अर्थाच्या गाभ्याला धक्का न देता

अनुवाद करण्याचा प्रयत्न इथे केलेला आहे, एवढेच सांगावेसे वाटते.

श्री. अरविंद पाटकरांनी प्रेमाग्रहाने माझेकडून हे काम पूर्ण करवून घेतल्याबद्दल त्यांचे आणि पुस्तकाचे मुद्रण सुबक व्हावे म्हणून काळजी घेतल्याबद्दल श्री. अशोक फलदेसाई यांचे मनःपूर्वक आभार. सौ. मिनाक्षी मून यांच्या सहकार्यावाचून तर हे काम पूर्ण करणे दुरापास्त होते. त्यांचे आभार शब्दातीत आहेत.

वसंत मून

# संस्थाने आणि अल्पसंख्यांक

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
शाखा (स्थळ प्रत)

भारताचे संविधान तयार करण्याचे काम घटना समितीला सोपविण्याचे निश्चित झाल्याबरोबर अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकारी मंडळाने अस्पृश्यांच्या हक्कासंबंधीचे निवेदन फेडरेशनतर्फे घटनासमितीला सादर करण्याकरिता, तयार करण्याचे काम माझ्यावर सोपविले. मी आनंदाने हे काम स्वीकारले. माझ्या श्रमाचे फळ या लहानशा पुस्तिकेत आहे.

या निवेदनात मूलभूत हक्क, अल्पसंख्यांकांचे अधिकार आणि अस्पृश्यांच्या संरक्षणविषयक तरतुदी यांचे स्पष्टीकरण आहे. **अस्पृश्य हे अल्पसंख्य नाहीत** असे मानणारे जे महाभाग आहेत, त्यांना मी मर्यादातिरेक केला असे वाटण्याचा संभव आहे. अस्पृश्य समाज अल्पसंख्य नाही हा उच्च आणि बलदंड अशा हिंदु बहुसंख्यांकांनी लावलेला नवीन जावईशोध आहे. या बहुसंख्यांकांच्या प्रवक्त्यांनी त्यांच्या विधानाचा अर्थ व व्याप्ती स्पष्ट करण्याची देखील तसदी घेतलेली नाही. एक सर्वसाधारण सूचना म्हणून जरी एखाद्याने निर्विकल्प आणि स्वच्छ मनाने याचा विचार केला तरी त्याला या सूचनेतून दोन अर्थ काढता येतील. मी याचा अर्थ असा काढतो, की अस्पृश्य हे अन्य अल्पसंख्यांकांपेक्षा वेगळे आहेत. आणि अन्य नागरिकांना व अल्पसंख्यांकांना मिळणारे कोणतेही संरक्षण अस्पृश्यांच्या बाबतीत पुरेसे नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे अस्पृश्याची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अवस्था अन्य अल्पसंख्य व सामान्य नागरिकांपेक्षा इतकी निकृष्ट आहे की अन्य नागरिकांना मिळणारे संरक्षण तर त्यांना मिळायलाच हवे शिवाय बहुसंख्यांकांच्या अन्याय व अत्याचारांपासून संरक्षण मिळण्याकरिता त्यांना खास तरतुदीची आवश्यकता आहे.

वरील सूचनेतून निघणारा दुसरा अर्थ असा आहे की, "अस्पृश्य हे अन्य अल्पसंख्यांकापेक्षा वेगळे आहेत, सबब अन्य अल्पसंख्यांकांना मिळणाऱ्या संरक्षणास ते पात्र नाहीत." हा अर्थ इतका मूर्खपणाचा आहे की कोणताही सूज्ञ माणूस इकडे लक्ष देणार नाही. अस्पृश्यांनी जर अशा विधानांकडे दुर्लक्ष केले तर त्यांना कोणीही दोष देऊ नये. अस्पृश्य हे अन्य अल्पसंख्यांकांसारखे अल्पसंख्यांक नाहीत हे माझे मत ज्यांना मान्य आहे ते माझ्याशी निश्चितपणे सहमत होतील की अन्य नागरिकांचे मूलभूत हक्क, अल्पसंख्यांकांच्या संरक्षणविषयक तरतुदी, आणि शिवाय खास संरक्षण विषयक तरतुदी अस्पृश्यांना मिळाव्यात ही माझी मागणी पूर्णतः न्याय्य आहे.

हे निवेदन घटनासमितीला सादर करण्याचे हेतूने तयार केले होते. लोकांमध्ये वितरण करावे असा याचा हेतु नव्हता. परंतु या निवेदनाची टंकलिखित प्रत जेव्हा माझ्या काही हिंदु मित्रांच्या वाचनात आली तेव्हा त्यांनी हे निवेदन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचावे असा आग्रह धरला. जरी हे निवेदन घटनासमितीच्या सदस्यांकरिता तयार करण्यात आले आहे तरी ते सामान्य जनतेला वाचायला मिळाल्याने सभागृहाचा हक्कभंग होतो असे मला वाटत नाही. म्हणून मी माझ्या मित्रांचे म्हणणे निमूटपणे मान्य केले.

माझे विचार सामान्य लेखाच्या पद्धतीने न मांडता संविधानातील अनुच्छेदाच्या धर्तीवर मांडले आहेत. माझी खात्री आहे की विषयाची मांडणी थोडक्यात व मुद्देसुद करण्याचे दृष्टीने ही पद्धत खूप उपयुक्त आहे. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकारी समिती सदस्यांच्या उपयोगाकरिता काही स्पष्टीकरणार्थ टीपा आणि आकडेवारी तयार केली होती. ही माहिती अन्य सामान्य वाचकांलाही उपयुक्त ठरेल असे वाटल्यामुळे, ती मागे राखून न ठेवता या निवेदनासोबत छापणे बरे, असे मला वाटते.

ज्याला घटनासमितीला तोंड द्यावे लागणार आहे अशा अनेक समस्यांपैकी दोन गोष्टी सर्वात जास्त दुष्कर आहेत याची सर्वांना जाणीव आहे. पहिली समस्या अल्पसंख्यांकांची आहे तर दुसरी भारतीय संस्थानांसंबंधी आहे. भारतीय संस्थानासंबंधीच्या प्रश्नांचा मी एक अभ्यासक आहे आणि या विषयावर माझी काही निश्चित व इतरांपेक्षा वेगळी मतेही आहेत. संस्थानांचा प्रश्न हाताळणाऱ्या समितीवर घटना समिती माझी नेमणूक करील अशी मला आशा होती. परंतु या कामासाठी माझ्यापेक्षा जास्त कर्तृत्ववान माणसे त्यांना मिळाली असावी. कदाचित असेही असेल की मी त्यांच्या गोटातील नसल्यामुळे अडगळीचा वाटलो असेन. काही का असेना, मला वगळले हे मात्र खरे, त्याबद्दल मला मुळीही खेद नाही. मला वाईट याचे वाटले की समितीसमोर माझे विचार व्यक्त करण्याची संधी जी मी शोधीत होतो, ती मला गमवावी लागली. त्यामुळे मला हा दुसरा मार्ग पत्करावा लागला तो म्हणजे या छोट्याशा पुस्तिकेत माझे विचार मांडणे व सोबतच नागरिकांचे, अल्पसंख्यांकांचे व अस्पृश्यांचे अधिकार समाविष्ट करणे या पुस्तिकेमुळे माझे विचार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचतील, ते या विचारांचे मूल्यांकन करतील आणि त्यांचा ज्याप्रकारे उपयोग करावासा वाटेल तसा ते करू शकतील.

**– बी. आर. आंबेडकर**

राजगृह,
दादर, मुंबई-१४.
दि. १५-३-१९४७

# भारतीय संघराज्याचे संविधान

## प्रास्ताविका

(स्पष्टीकरणांसाठी पृष्ठ २६ पहा.)

ब्रिटिश भारतातील प्रशासकीय घटक, ज्यांना प्रांत आणि केंद्रशासित प्रदेश असे संबोधतात, आणि भारतीय संस्थाने, या सर्व प्रदेशातील आम्ही लोक, या सर्व भूप्रदेशांना एकात्म संघराज्य बनविण्याचे हेतुने संकल्प करीत आहोत की,

प्रांत आणि केंद्रशासित प्रदेश (ज्यांना यापुढे "राज्य" असे संबोधण्यात येईल) आणि भारतीय सस्थाने यांना वैधानिक, कार्यकारी व प्रशासकीय संबंधाचे हेतुने एक राजकीय घटक म्हणून भारतीय संघराज्य या नांवाखाली एकत्र बांधण्यांत येईल आणि अशा प्रकारे अस्तित्वात आलेले संघराज्य अखंड राहील आणि–

१) या भारतीय संघराज्यात आम्हाला व आमच्या पुढील पिढ्यांना स्वराज़्य आणि सुराज्याचा लाभ व्हावा,

२) प्रत्येक नागरिकाचे जीवित, स्वातंत्र्य व सुखप्राप्तीची धडपड अबाधित राहावी आणि भाषण स्वातंत्र्य व धर्माचरणाचे स्वातंत्र्य कायम राहावे,

३) दडपलेल्या वर्गांना (Submerged classes) (इतरांच्या तुलनेत) सरस सवलती देऊन सामाजिक राजकीय आणि आर्थिक विषमता नष्ट करावी

४) प्रत्येक नागरिकास आवश्यक गरजा पूर्ण करण्याचें व निर्भीड होण्याचें स्वातंत्र्य मिळेल अशी परिस्थिती निर्माण करावी.

५) आणि अंतर्गत अशांतता व बाह्य आक्रमण याविरुद्ध योग्य उपाय योजावे, या हेतुने भारतीय संयुक्त राज्याकरिता संविधान निर्माण करीत आहोत.

## Proposed Article I

## प्रस्तावित अनुच्छेद : १ — सविस्तर विश्लेषण

### अनुच्छेद १ — भाग — १ : भारतीय संस्थानांचा संघराज्यात प्रवेश

खंड १ : पात्र भारतीय संस्थाने व त्यांचा संघराज्यात प्रवेश.

खंड २ : पात्र ठरलेली भारतीय संस्थाने जी संघराज्यात प्रविष्ट झाली नाहीत तसेच प्रविष्ट होण्यास अपात्र ठरवलेली भारतीय संस्थाने यांचा भारतीय संघराज्याशी संबंध.

खंड ३ : प्रवेशास अपात्र ठरलेल्या भारतीय संस्थानांना पात्र ठरवून त्यांना भारतीय संघराज्यातील राज्य म्हणून प्रविष्ट करण्याचे हेतुने तत्संबंधी संस्थानांच्या प्रादेशिक मर्यादांचे पुनर्घटन करण्याचे भारतीय संघराज्याचे अधिकार.

खंड ४ : संघराज्यांतर्गत नवीन राज्ये तयार करणे.

### अनुच्छेद १ भाग २ : भारताचे संयुक्तराज्य व नवीन भूप्रदेश

**खंड १** : परकीय राज्यांचा संघराज्यात समावेश करणे.

**खंड २** : भारतीय संयुक्तराज्यासाठी नवीन भूप्रदेश हस्तगत (Acquisition) करणे आणि या प्रदेशांना संघराज्यातील समाविष्ट नसलेले प्रदेश म्हणून ठेवून घेणे.

## Article 1 : Section — 1

## अनुच्छेद – भाग १

# भारतीय संस्थानांचा संघराज्यांतर्गत प्रवेश

### Clause — 1 खंड – १

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ २६–२७ पहा.)

भारतीय संस्थानाने अर्ज दिल्यानंतर आणि संघराज्याच्या विधानमंडळाने संविधानाचे स्वरूप ठरविणाऱ्या संभाव्य कायद्यातील (Enabling Act) अटी पूर्ण केल्या असे दिसून येताच त्या संस्थानास संघराज्यात प्रवेश देण्यात येईल. मात्र असे संस्थान हें "पात्र असलेले संस्थान" असावे.

या अनुच्छेदाकरता "पात्र भारतीय संस्थानांची" यादी तयार करण्यात येईल. जोपर्यंत, भारतीय विधी मंडळाने निर्धारीत केलेल्या एका विशिष्ठ आकारा एवढा त्या संस्थानाचा आकार नाही, त्या राज्यातील निसर्गसाधने आपल्या लोकांचे जीवनमान उत्तम राखण्यास पुरेसे नाहीत, त्या राज्याचे उत्पन्न व लोकसंख्या यामुळे कारभार हाकण्यास ते राज्य स्वयंपूर्ण नाही, परकीय आक्रमणापासून संरक्षण व अंतर्गत कायदा व सुव्यवस्था स्थापन करण्यास ते राज्य लायक नाही, आणि कोणत्याही आधुनिक राज्यातील लोककल्याणाच्या व प्रशासनाच्या ज्या कमीत कमी अपेक्षा असतात त्या त्यात पूर्ण केलेल्या नाहीत, तोपर्यंत कोणतेही संस्थान हे "पात्र संस्थान" समजले जाणार नाही.

### खंड – २ (Clause — 2)

भारतीय संस्थान, जे "पात्र संस्थान" आहे परंतु संघराज्यात आलेले नाही अशा संस्थानांचा भू-प्रदेश आणि अपात्र ठरलेल्या भारतीय संस्थानाचा भूप्रदेश हे सर्व भारतीय संघराज्याचे प्रविष्ठ (Incorporated) भूप्रदेश समजण्यात येतील आणि ते संघराज्याचा एक अविभाज्य भाग समजले जातील. तसेच विधान मंडळाने संमत केलेल्या भारतीय संघराज्याच्या संविधानाच्या ठराविक तरतुदींना जबाबदार रहातील.

### खंड – ३ (Clause — 3)

भारतीय संघराज्यात प्रविष्ट होण्यास "अपात्र ठरलेल्या संस्थानां"च्या सरहद्दीमध्ये १) सुधारणा, २) पुनर्घटना, ३) पुनर्वाटप, अथवा ४) त्यांचे एकत्रीकरण करून या संस्थानांना भारतीय संघराज्यातील योग्य प्रशासकीय घटक म्हणजे राज्य म्हणून प्रवेश देण्याचा भारतीय संघराज्यास अधिकार राहील.

### खंड – ४ (Clause — 4)

संघराज्यात राज्य म्हणून प्रविष्ठ झाल्यानंतर कोणत्याही राज्यास, त्याचे सरहद्दीत नवे राज्य निर्माण करता येणार नाही तसेच दोन अथवा जास्त राज्ये अथवा त्यांचे भूभाग एकत्र करून, संबंधित राज्यांच्या तसेच संघराज्याच्या विधानमंडळाकडून संमति मिळाल्याशिवाय, नवीन राज्य निर्माण करता येणार नाही.

## Article — I : Section - 2

## अनुच्छेद – १ : भाग – २

(स्पष्टीकरणासाठी पृष्ठ २७ पहा.)

### खंड १ – (Clause — I)

भारताचा नैसर्गिक भाग असलेला अथवा त्या सरहद्दीस लागून असलेला कोणताही भूभाग, उभय पक्षास संमत असलेल्या अटीनुसार भारताचे संघराज्य आपल्या राज्यात समाविष्ट करू शकेल. मात्र या अटी भारतीय संघराज्याच्या संविधानाशी विसंगत नसाव्यात तसेच भारतीय संघराज्यातील अर्ध्या राज्यविधीमंडळांनी ठरावाद्वारे अशा विलीनीकरणाची शिफारस करायला हवी.

### खंड – २ (Clause — 2)

भारतीय संघराज्य कोणताही भूप्रदेश हस्तगत करून त्याला अप्रविष्ट (Unincorporated) (अनिगमित) प्रदेश म्हणून ठेवू शकेल. जोपर्यंत भारतीय संघराज्य अशा अप्रविष्ट प्रदेशासंबंधी भारतीय संविधानांत तरतूद करणार नाही तोपर्यंत भारतीय संविधानातील तरतुदी त्या प्रदेशास लागू होणार नाहीत.

## Proposed Article — II

## प्रस्तावित अनुच्छेद – २ :

## सविस्तर विश्लेषण

**अनुच्छेद** – २ : **भाग** – १ :– नागारिकांचे मूलभूत अधिकार.

**अनुच्छेद** – २ : **भाग** – २ :– मूलभूत अधिकारांवर होणाऱ्या आक्रमणाविरुद्ध उपाय.

खंड – १) :– न्यायालयीन संरक्षण.

खंड २) :– विषंम वागणुकीपासून संरक्षण

खंड – ३) :– भेदभाषाविरुद्ध संरक्षण

खंड – ४) :– आर्थिक शोषणा विरुद्ध संरक्षण

**अनुच्छेद** – २ : **भाग** – ३ :– अल्पसंख्यांकांच्या संरक्षणाच्या तरतुदी.

खंड – १) :– जातीय कार्यकारिणीपासून संरक्षण

खंड – २) :– सामाजिक व अधिकाऱ्यांच्या छळणुकीपासून संरक्षण

खंड – ३) :– सामाजिक बहिष्कारापासून संरक्षण.

खंड – ४) :– सार्वजनिक हिताच्या, ज्यात अल्पसंख्यांकांच्या हिताचा समावेश होतो, अशा बाबींवर खर्च करण्याचा केंद्र व राज्य सरकारांचा अधिकार व दायित्व.

**अनुच्छेद** – २ : **भाग** – ४) :– अनुसूचित जातींकरिता संरक्षक तरतुदी

**विभाग** १ :– हमी.

खंड – १) :– विधानमंडळे व स्थानिक संस्था यात प्रतिनिधीत्वाचा अधिकार.

खंड – २) :– कार्यकारिणीत प्रतिनिधीत्वाचा अधिकार.

खंड – ३) :– शासकीय सेवेत प्रतिनिधीत्वाचा अधिकार.

**विभाग** – २ :– विशेष जबाबदाऱ्या.

खंड – १) :– उच्चतर शिक्षण.

खंड – २) :– स्वतंत्र वसाहती.

**विभाग**– ३ :– संरक्षण विषयक तरतुदींची दुरुस्ती आणि अंमलबजावणी.

खंड – १) :– संरक्षण विषयक तरतुदींचा संविधानात अंतर्भाव.

खंड – २) :– संरक्षण विषयक तरतुदींची दुरुस्ती.

**विभाग**– ४ :– भारतीय संस्थानांतील अनुसुचित जातींना संरक्षण.

**विभाग** – ५ :– अन्वयार्थ. (निर्वचन)

## Article — II — Section — I

## अनुच्छेद – २ : भाग – एक

# नागरिकांचे मूलभूत अधिकार

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ २७ पहा)

भारतीय संघराज्याचे संविधान खालील मूलभूत अधिकार मान्य करील.

१) भारतीय संघराज्याच्या अथवा जेथे ते राहतात त्या राज्याच्या सरहद्दीत ज्यांचा जन्म झाला असेल अथवा ज्यांचा स्वाभाविकपणें विकास झाला असेल ते सर्व भारतीय संघराज्याचे तसेच त्या राज्याचे नागरीक आहेत.

एखादे पद, जन्म, कुटुंब, धर्म अथवा धार्मिक परंपरा व रूढी यामुळे प्राप्त झालेला विशेषाधिकार अथवा हीनपणा नष्ट करण्यात येत आहे.

२) कोणतेही राज्य असा कायदा करणार नाही अथवा अशी परंपरा लादणार नाही ज्यामुळे नागरिकांच्या अलिप्ततेचा (उन्मुक्ततेचा) (Immunities) अथवा सवलतींचा संकोच होईल अथवा कोणत्याही व्यक्तीचे जीवित, वित्त व स्वातंत्र्याचे हक्क कायदेशीर प्रक्रिये वाचून हिरावले जाईल अथवा कोणत्याही व्यक्तीला त्या राज्याच्या हद्दीत कायद्याचे समान संरक्षण नाकारले जाईल.

३) सर्व नागरिक कायद्याचे दृष्टीने समान आहेत व सर्वांना नागरिकत्वाचे समान अधिकार आहेत.

सद्यस्थितीत अस्तित्वात असलेला कोणताही कायदा, नियम, आदेश, रूढी अथवा विधी विश्लेषण (Interpretation of Law) यांचेमुळे एखाद्या नागरिकास दंड, गैरसोय अथवा बंधन निर्माण केले गेले असेल अथवा पक्षपात होत असेल तर असे सर्व कायदे (वगैरे) हे संविधान अंमलात आल्यापासून रद्द ठरतील.

४) सामाजिक प्रतिष्ठेचा विचार न करता सर्व वर्गांना लागू असलेल्या कायद्यांतर्गत तरतुदींचा अपवाद वगळता, व्यक्तीला राहण्याच्या अथवा अन्य सवलतींच्या,

उपभोगापासून, खाणावळीच्या सोयीपासून, शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशांपासून, रस्ते, पायवाटा, बोळी, तलाव, विहीरी आदि पाणवठ्याची स्थळे, भूमि, आकाश आणि समुद्रावरील वाहने, थिएटर अथवा सार्वजनिक मनोरंजनाची स्थळे, जी लोकांकरितां, लोकांनी चालवलेली अथवा लोकांच्या उपयोगाची आहेत, या साऱ्यांचा वापर करण्यापासून, जर कुणी वंचित केले तर अशी व्यक्ती गुन्हागार ठरेल.

५) लोकांनी अथवा लोकांकरिता चालविण्यात येणाऱ्या सर्व (सार्वजनिक) संस्था, वाहने आणि सुखसोयी यात सर्व नागरिकांना प्रवेश करण्याचा समान अधिकार राहील.

६) कोणत्याही सार्वजनिक पदाकरिता अथवा व्यापार वा धंद्याकरितां कोणत्याही नागरिकास त्याच्या धर्म, जात, पंथ, लिंग अथवा सामाजिक स्तर या बाबीमुळे अपात्र ठरवता येणार नाही.

७) ( एक) प्रत्येक नागरिकास भारताच्या कोणत्याही भागात रहाण्याचा अधिकार राहील. सार्वजनिक सुरक्षितता आणि नैतिकता या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणाने नागरीकाचा रहाण्याचा अधिकार संकुचित करणारा कायदा करता येणार नाही.

(दोन) प्रत्येक नागरिकास त्याच्या मूळ राज्यातून मिळालेल्या नागरिकत्वाच्या प्रमाणपत्राच्या आधारे भारताच्या अन्य कोणत्याही राज्यात वसाहत करता येईल. अशा नागरिकास, याच खंडातील उपखंड (चार) (Sub-Clause — 4) मध्ये दर्शविलेल्या कारणाव्यतिरीक्त अन्य कोणत्याही मुद्यांवर वसाहत करण्याची परवानगी नाकारता येणार नाही अथंवा दिलेली परवानगी परत घेता येणार नाही.

(तीन) वसाहत करू इच्छिणाऱ्या नागरिकावर अन्य नागरिकांना द्याव्या लागणाऱ्या करांच्या निर्बंधा व्यतिरिक्त अन्य कोणताही विशेष कर त्या राज्यानें लादू नये. वसाहतीच्या परवानगी करीता लागणारे जास्तीत जास्त शुल्क केंद्र विधी मंडळ कायदे करून निश्चित करील.

(चार) वसाहतीची परवानगी राज्यसरकारद्वारे खालील व्यक्तींना नाकारली जाऊ शकेल किंवा मागे घेण्यात येईल.

(अ) धंदेवाईक गुन्हेगार.

(ब) त्या राज्यातील जातीय समतोल बिघडवण्याच्या हेतूने ज्यांना वसाहत करावयाची आहे. असे लोक

(क) ज्या राज्यात वसाहत करावयाची आहे त्या राज्यातील अधिकाऱ्यांना जे असे सिद्ध करून देवू शकत नाहीत की, त्यांना पोट भरण्याचे खात्रीचे साधन आहे आणि ते लोकांच्या भिक्षेवर जगत नाहीत अथवा तेथील लोकांच्या दातृत्वावर कायमचे ओझे होणार नाहीत.

(ड) ज्यांच्या मूळ राज्यातील सरकारला विनंती करून देखील ज्यांना योग्य ती मदत करण्यास ते राज्य तयार नाही.

(पांच) अर्जदार काम करण्यास सुदृढ असेल, त्याच्या मूळ राज्यात लोकांच्या भिकेवर जगत नसेल आणि बेकार राहणार नाही असा जामीन देण्यास तयार असेल तर

त्याला वास्तव्य करण्यास सशर्त परवानगी देण्याचा विचार व्हावा.

(सहा) प्रत्येक हद्दपारीला (केंद्र) सरकारची अनुमति हवी.

(सात) कायम वसाहत (Settlement) व तात्पुरते वास्तव्य (Residence) यातील भेद केंद्रीय विधानमंडळ विशद करील त्याचवेळी व्यक्तीच्या तात्पुरत्या वास्तव्याच्या काळात त्याचे राजकीय व नागरिकत्वाचे अधिकार नियमित करणारे निर्बंध निश्चित करील.

८) भारताच्या कोणत्याही भागात, एखाद्या जमातीवर होणाऱ्या अत्याचारापासून तसेच अंतर्गत हिंसाचार व गुंडगिरीपासून संरक्षण करण्याची केंद्र सरकार हमी घेईल.

९) एखाद्या व्यक्तीस वेठबिगारी करण्यास लावणे अथवा मनाविरुद्ध काम करण्यास सक्ती करणे हा गुन्हा ठरेल.

१०) लोकांचे जीवित राहते घर, वित्त व मालमत्ता यांची अकारण झडती व जप्ती यापासून संरक्षण मिळणाऱ्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही, तसेच शपथेवर एखादे संभाव्य कारण दाखवून विशिष्ठ जागेचा, तेथील जप्त करण्याच्या वस्तुंचा अथवा व्यक्तींचा उल्लेख केल्यावाचून कोणताही झडतीचा व जप्तीचा वारंट काढता येणार नाही.

११) अज्ञान असणे, कारावास अथवा वेडेपणा या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही सबबीखाली नागरिकाचा मतदानाचा अधिकार नाकारता येणार नाही. अथवा मर्यादित करता येणार नाही.

१२) सार्वजनिक हित व नैतिकता या दोन बाबी वगळता अन्य कोणत्याही सबबीखाली भाषण स्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य व सभा-संमेलनाचे स्वातंत्र्य, यांचा अधिक्षेप करणारा कोणताही कायदा करता येणार नाही.

१३) गतकाळापासून लागू होणारा कायदा मंजूर करता येणार नाही.

१४) सार्वजनिक हित आणि नैतिकता यास अनुसरून आपल्या धर्माचा आचार, प्रचार व धर्मांतर करण्याची, तद्वतआपल्या सद्सद्विवेक बुद्धीप्रमाणे वागण्याची हमी प्रत्येक नागरिकाला राज्य सरकार देईल.

१५) विशिष्ट धर्मसंस्थेचे सभासद होण्यास, विशिष्ट धर्माच्या आज्ञा पालन करण्यास अथवा विशिष्ठ धार्मिक कृत्ये करण्यास कोणत्याही व्यक्तीवर जबरदस्ती करता येणार नाही.

उपरिनिर्दिष्ट तरतुदींस अनुसरूनच पालक व मातापित्यांना आपल्या मुलांना त्यांच्या वयाच्या १६व्या वर्षांपर्यंत धार्मिक शिक्षण देण्याची मुभा राहील.

१६) एखादी व्यक्ती, विशिष्ट जातीची, पंथाची वा धर्माची आहे या कारणास्तव त्या व्यक्तीला कोणताही दंड देता येणार नाही. तसेंच कोणत्याही व्यक्तीस एखाद्या जातीचा, पंथाचा अथवा धर्माचा असण्याच्या सबबीखातर नागरिकत्वाची जबाबदारी नाकारता येणार नाही.

१७) राज्याला कोणताही धर्म, राजधर्म म्हणून मान्यता देता येणार नाही.

१८) कोणत्याही धर्माच्या लोकांना संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य राहील. तसेच त्यांची इच्छा असल्यास कांही अटींवर आपले एक महामंडळ (निगमनिकाय) (Corporate Body) स्थापन करण्याचा कायदा करण्यासाठी राज्यसरकारला विनंति करण्याचा त्यांना अधिकार राहील.

१९) सर्वांना लागू असलेल्या कायद्यांतर्गत, प्रत्येक धार्मिक संघटनेला आपल्या सघटनेचे नियमन व प्रशासन करण्याचे स्वातंत्र्य राहील.

२०) जर निगमन (Incorporation) कायद्यांत तरतूद असेल तर धार्मिक संस्था आपल्या सभासदांवर जे स्वखुषीने देण्यास तयार असतील, त्यांचेवर वर्गणी लादू शकेल.

ज्या कराची रक्कम एखाद्या विशिष्ट धार्मिक जमातीकरिता उपयोगात येणार असेल, त्या जमातीचा सभासद नसलेल्या व्यक्तीला अशा कराची रक्कम देण्यास बाध्य करता येणार नाही.

२१) या कलमाखाली सर्व गुन्हे दखलपात्र राहतील. ज्या तरतुदींकरितां कायदा करण्याची गरज आहे अशा तरतुदींकरिता केंद्रीय विधीमंडळ कायदा करील आणि जी कृत्ये गुन्हा गणली जातील त्या कृत्यांबद्दल शिक्षेची तरतूद करील.

## Artical — II — Section — II

### अनुच्छेद दोन : भाग – २

### मूलभूत अधिकारांवर आक्रमण झाल्यास उपाय भारतीय संघराज्य खालील तरतुदी करील :

**खंड – १ : (Clause — I)**

**कार्यकारीणीच्या अत्याचारा विरुद्ध न्यायालयाकडून संरक्षण**

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ३० पहा)

१) सर्वोच्च न्यायालयात संपूर्ण भारताचे न्यायालयीन अधिकार समाविष्ट होतील.

२) सर्व न्यायालये व त्यातील न्यायालयीन अधिकारी, (त्यांना अपील अथवा पुनर्निर्णयाचे अधिकार असो अथवा नसो) यांचेवर सर्वोच्च न्यायालयाची अधिसत्ता राहील.

३) एखाद्या निर्णयाविरुद्ध दाद मागायला आलेल्या व्यक्तीच्या अर्जावर, ज्याला रिटचा स्वाधिकार म्हणतो त्या अन्वये हेबियस कॉर्पस, (दोहोपस्थिती), को–वारन्टो (अधिकार), प्रोहिबिशन (प्रतिषेध), सर्टिरिओररी (प्राकर्षण) आणि मंडामस (महादेश) काढण्याचा अधिकार राहील. याकरितां सर्वोच्च न्यायालय हे संपूर्ण भारतात कार्यक्षेत्र असलेले सर्वव्यापक न्यायालय समजण्यात येईल.

४) बंड अथवा आक्रमणाची परिस्थिती याचा अपवाद वगळता रिट (प्राधिलेख) करीता अर्ज करण्याचा अधिकार प्रलंबित अथवा संकुचित करता येणार नाही.

**खंड – २ (Clause — 2)**

**विषम वागणुकी विरुद्ध संरक्षण**

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ २८–३० पहा)

केंद्र तसेच समग्र भारतातील प्रत्येक राज्य सरकारांच्या विधानमंडळे व कार्यकारिणीचे अधिकार निम्नलिखित बंधनांनी मर्यादित राहतील.

भारतातील कोणत्याही विधानमंडळास अथवा कार्यकारिणीस नागरिकांच्या खालील अधिकारांवर अतिक्रमण करणारा कायदा मंजूर करण्याचा अथवा तसा आदेश, नियम अथवा निर्बंध (Regulation) काढण्याचा अधिकार राहणार नाही.

१) करार करण्याचा व तो अंमलांत आणण्याचा, दावा करण्याचा आणि पक्षकार म्हणून राहण्याचा अथवा पुरावा देण्याचा, संपत्तीचा वारसा मिळविण्याचा, तसेच खाजगी संपत्ती खरेदी-विक्री करण्याचा वा भाडेपट्ट्याने देण्याघेण्याचा अधिकार.

२) राज्यातील नागरिकांच्या सर्व वर्गांना योग्य व पुरेसे प्रतिनिधित्व मिळवून देण्याच्या हेतूने लादलेल्या ठराविक अटी व बंधने सांभाळून सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये आणि मुलकी व लष्करी नोकऱ्यांत प्रवेश मिळविण्याचा अधिकार.

३) सर्व वंश, वर्ग, जाती, वर्ण आणि पंथ यांना लागू असलेली बंधने सांभाळून, शैक्षणिक संस्था, खाणावळी, उपहारगृहे, नद्या, पाणवठे, विहीरी, तलाव, रस्ते, महामार्ग, भूमि, जल आणि आकाश यातून जाणारी सार्वजनिक वाहने, सार्वजनिक नाट्यगृहे व इतर मनोरंजनाच्या जागा, यांचा वापर करण्याचा अधिकार,

४) सर्वसामान्य लोकांकरिता अथवा एखाद्या विशिष्ठ धर्माच्या वा पंथाच्या लोकांकरिता निर्माण झालेल्या, चालवण्यात येणाऱ्या अथवा मान्यता मिळालेल्या धार्मिक अथवा धर्मादाय विश्वस्त संस्थेच्या लाभांचा, कोणताही भेद न पाळता उपभोग घेण्याचा अधिकार,

५) धर्माधिष्ठित अथवा अन्य रूढी आणि परंपरा यांना बाध न येता इतर नागरिकांच्या वित्त व प्राणाच्या रक्षणासाठी केलेले कायदे व त्यांची अंमलबजावणी यांचा पूर्ण व समान लाभ घेण्याचा तसेच इतरांप्रमाणेच शिक्षा व दंडास पात्र ठरण्याचा अधिकार

## खंड – ३ (Clause — 3)

**भेदभावाविरूद्ध संरक्षण**

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ३० पहा)

१) सार्वजनिक प्रशासनातील शासकीय अधिकारी अथवा खाजगी कारखाने अथवा व्यापारी कंपन्यांचे मालक यांनी एखाद्यास वंश, जात अथवा सामाजिक स्तर लक्षात घेऊन पक्षपाती वागणूक दिल्यास, हे कृत्य गुन्हा समजले जाईल. असे दावे चालविण्याचा अधिकार, या उद्दिष्टांसाठी खास निर्माण करण्यात आलेल्या लवादाकडे (ट्रायबुनलकडे) राहील.

२) केंद्रीय विधान मंडळास, या तरतुदींना अंमलांत आणण्यासाठी योग्य तो कायदा करण्याचा अधिकार तर राहीलच परंतु हे करण्याचे बंधनही राहील.

## खंड ४ (Clause — 4

**आर्थिक शोषणाविरुद्ध संरक्षण** (स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ३०—३५ पहा).

भारतीय संघराज्य आपल्या संविधानातील कायद्याचा भाग म्हणून खालील बाबींचा समावेश करील.

१) जे उद्योगधंदे मूलभूत (Key) उद्योगधंदे आहेत अथवा जे तसे जाहीर करण्यांत येतील, असे उद्योगधंदे राज्यसरकारच्या मालकीचे राहतील व ते राज्यसरकार चालवील.

२) जे मूलभूत उद्योगधंदे नाहीत परंतु पायाभूत (Basic) उद्योग आहेत ते सर्व राज्याच्या मालकीचे राहतील व ते राज्य सरकार किंवा त्यांनी स्थापन केलेल्या महामंडळातर्फे चालवण्यात येतील.

३) विमाधंद्यावर राज्याचा मक्ता राहील. प्रत्येक सज्ञान नागरिकास राज्य विधानमंडळाने केलेल्या कायद्यानुसार त्याच्या उत्पन्नाशी जुळेल असा विमा काढण्याची राज्य सरकार सक्ती करील.

४) कृषी उद्योग हा राज्याचा राष्ट्रीय उद्योग राहील.

५) खाजगी व्यक्तींच्या मालकीचे, भाड्याचे किंवा गहाण असलेले उद्योग, विमा कंपन्या व शेतजमिनी यातील त्या व्यक्तींचे अधिकार राज्यसरकार संपादन करील आणि त्याचे मोबदल्यात त्या व्यक्तींस कर्जरोख्याचे (Debentures) स्वरूपात मूल्य प्रदान करील. मात्र जमीन, उद्योग अथवा हिश्श्याचे मूल्यमापन करतांना आपत्कालीन परिस्थितीमुळे वाढलेले, अर्जित नसलेले. अथवा भविष्यात प्राप्त होणारे उत्पन्न सक्तीच्या संपादनाचे बाबतीत विचारात घेतले जाणार नाही.

६) रोखेधारक आपली रोख रक्कम कशी आणि केव्हां मागणी करू शकतील हे राज्य सरकार ठरवील.

७) कर्जरोख्याचे हस्तांतरण करता येईल तसेच वारसा हक्कानेही ते वारसांना प्राप्त होतील. मात्र रोखेधारक अथवा ते घेणारा अथवा त्याचा वारस, राज्याने संपादन केलेल्या उद्योगातील जमीन अथवा त्यातील हिस्सा मागू शकणार नाही, अंथवा त्याबद्दल कोणताही व्यवहार करू शकणार नाही.

८) कायद्याने निर्धारित केलेल्या दराने व्याज घेण्याचा रोखेधारकास हक्क राहील. हे व्याज पैशाच्या अथवा वस्तूच्या स्वरुपात द्यावे, हे निश्चित करून त्याप्रमाणे राज्यसरकार व्याजाची रक्कम देईल.

९) कृषी उद्योगाची खालील मुद्यांवर रचना करण्यांत येईल.

(एक) संपादित केलेल्या जमिनीचे ठराविक आकाराचे राज्यसरकारद्वारे तुकडे करण्यात येतील आणि असे तुकडे गावातील रहिवाशांना (काही कुटुंबाचे गट करून) कुळ म्हणून खालील अटींवर वहिती (शेती) करण्यास देण्यात येतील.

(अ) असे शेत सामुदायिक (Collective शेती म्हणून वहिती करण्यात येईल.

(ब) सरकारने तयार केलेल्या नियम व सूचनांनुसारच शेताची वहिती करण्यात येईल.

(क) शेतीवर बसविलेला योग्य तो कर भरणा केल्यानंतर शेतीचे उरलेले उत्पन्न, ठरलेल्या पध्दतीप्रमाणे सर्व कुळामध्ये वाटण्यात येईल.

(दोन) ग्रामवासीयांना जातपंथाचा भेद न करता जमीन अशा पध्दतीने भाड्याने वाटण्यात येईल की, जेणेकरून गावामध्ये कोणीही जमीन मालक, कोणीही कुळ अथवा कुणीही भूमीहीन राहणार नाही.

(तीन) सामुदायिक शेतीत पाणी, वहितीसाठी जनावरे, शेतीची अवजारे, बी-बियाणे, खत आदि द्वारे आर्थिक मदत करण्याचे बंधन राज्यशासनावर राहील.

(चार) राज्यसरकारः—

(अ) शेतीच्या उत्पन्नावर खालील कर बसवू शकेलः—

(एक) शेतसारा म्हणून काही भाग, (ब) कर्जरोखेधारकांना देण्याकरिता काही भाग. (क) शासनाने दिलेल्या वस्तूंचा वापर केल्याबद्दल मोबदला म्हणून काही वाटा.

(ब) जी कुळे कुळासंबंधीच्या अटींचे उल्लंघन करतात अथवा राज्यसरकारने दिलेल्या वहितीच्या साधनांचा जाणीवपूर्वक दुरूपयोग करतात, अथवा सामुदायिक शेतीच्या योजनेला सुरूंग लावण्याचा प्रयत्न करतात, त्यांचेकरिता दंडाची तरतूद करील.

१०) ही योजना शक्य तितक्या लवकर अंमलात आणली जाईल. परंतु कोणत्याही परिस्थितीत संविधान अंमलात आल्याच्या तारखेपासून दहा वर्षापेक्षा जास्त काळ या योजनेची मुदतवाढ करता येणार नाही.

## Article - II: Section - III

## अनुच्छेद - २ : भाग - ३
## अल्पसंख्यांकांच्या संरक्षणासंबंधी तरतूद

**जातीय कार्यकारिणी पासून संरक्षण :**

भारतीय संघराज्याची घटना खालील बाबींची तरतूद करील:—

**खंड - १ (Clause - I)**

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ३५—३८ पहा).

१) केंद्रीय असो वा राज्याची असो, कार्यकारिणीला विधानमंडळाची मुदत संपण्यापूर्वी काढता येणार नाही. म्हणजेच एका अर्थाने ती असंसदीय (Non-Parliamentary) स्वरूपाची राहील.

२) विधानमंडळाचे सदस्य नसलेल्या मंत्रीमंडळाच्या सदस्यांना विधानमंडळात बसण्याचा, बोलण्याचा, मतदान करण्याचा, प्रश्नांना उत्तरे देण्याचा अधिकार राहील.

३) संपूर्ण सभागृहाद्वारे प्रधानमंत्री "एकमत हस्तांतरण" (एकल संक्रमणीय मत) (Single Transferrable Vote) पध्दतीने निवडला जाईल.

४) मंत्रीमंडळातील विभिन्न अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधी विधानमंडळातील प्रत्येक अल्पसंख्य जातीच्या प्रतिनिधींमधून " एकमत हस्तांतरण पध्दतीने" निवडण्यात येतील.

५) मंत्रीमंडळातील बहुसंख्य जातीचे प्रतिनिधी "एकमत हस्तांतरण" पध्दतीने पूर्ण सभागृहाद्वारे निवडण्यात येतील.

६) मंत्रीमंडळाचा सदस्य एखाद्या दोषारोपामुळे (Censure) किंवा अन्य काही कारणाने आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊ शकेल परंतु भ्रष्टाचार अथवा राजद्रोह या आरोपा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणामुळे त्याचेवर महाभियोग (Impeachment) ठेवून सभागृहाला काढता येणार नाही.

## खंड - २ (Clause -2)

**सामाजिक आणि शासकीय छळापासून संरक्षण** (स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ३९ पहा).

एक अधिकारी नेमण्यात येईल ज्याला "अल्पसंख्यांकांच्या समस्यांचा अधिक्षक" म्हणून संबोधण्यात येईल.

भारत सरकारच्या १९३५ च्या कायद्यातील कलम १६६ अन्वये नेमण्यात आलेल्या महालेखापालाच्या (ऑडिटर जनरलच्या) समान या अधिकाऱ्याचे पद राहील. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला ज्या कारणांकरिता व ज्या पध्दतीने पदच्युत करता येते त्याच पध्दतीने या अधिकाऱ्यास पदच्युत करता येऊ शकेल.

सामान्य जनता, भारत सरकार अथवा राज्य सरकारे यांचेकडून अल्पसंख्यांकांना दिली जाणारी वागणूक, अथवा सरकारे व त्यांच्या अधिकाऱ्यांद्वारे अल्पसंख्यांकांच्या कोणत्याही संरक्षण विषयक तरतुदीचे उल्लंघन अथवा जातीय द्वेषामुळे होणारा अन्याय याबद्दल दरवर्षी अहवाल तयार करणे हे या अधीक्षकांचे कर्तव्य राहील. संघ व राज्य सरकार यांच्या विधानमंडळासमोर अधीक्षकाचा वार्षिक अहवाल ठेवण्यात येईल व या अहवालाची चर्चा करण्याकरिता वेळ देण्याचे केंद्र व राज्य सरकारे या उभयतांना बंधन राहील.

## खंड - ३ (Clause - 3)

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ३९–४२ पहा).

सामाजिक बहिष्कार टाकणे, सामाजिक बहिष्कार करण्यास प्रवृत्त करणे अथवा उत्तेजन देणे, अथवा सामाजिक बहिष्काराचा धाक घालणे, ज्यांची व्याख्या खाली दिलेली आहे, या सर्व बाबी गुन्हा म्हणून जाहीर करण्यात येतील.

१) **बहिष्काराची व्याख्याः** कोणतीही व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस बहिष्कृत करते असे समजले जाईल, जर ती व्यक्तिः—

अ) दुसऱ्या व्यक्तीस, आपले घर अथवा जमीन भाड्याने राहण्यास वा वापरू देण्यास नाकारते, भाड्याने काम करवून घेण्यास नाकारते अथवा त्या व्यक्तीशी कोणतेही काम घेण्यास अथवा देण्यास नकार देते अथवा वरीलपैकी कोणतीही बाब इतरांशी सामान्यतः ज्या पध्दतीने करण्यात येते त्या पध्दतीने करण्यास नकार देते, अथवा

ब) भारतीय संविधानाने दिलेल्या मूलभूत व इतर नागरिकत्वाच्या अधिकारांशी विसंगत नसलेल्या प्रचलित रूढीचा मान राखून दुसऱ्या व्यक्तीशी सामान्यतः ज्याप्रकारचे व्यावहारिक, व्यावसायिक अथवा धंदेवाईक संबंध ठेवायला हवे तसे ठेवीत नाही, अथवा

क) अन्य व्यक्तीला त्याच्या कायदेशीर अधिकाराचा वापर करताना दुखावते, चिडविते अथवा हस्तक्षेप करते.

२) **बहिष्काराचा अपराधः—**

एखाद्या व्यक्तीस कृति करण्यास प्रवृत्त केले व कायद्याने बाध्य असलेली कृति करण्यापासून परावृत्त केले, अथवा त्या व्यक्तीच्या शरीर, मन, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांना इजा पोचवली अथवा त्याच्या धंद्यात किंवा उत्पन्नाच्या साधनास हानी पोचवली, अथवा अशा व्यक्तीस बहिष्कृत केले तर अशी व्यक्ती बहिष्काराच्या गुन्ह्यांची अपराधी व्यक्ती समजली जाईल.

तथापि आरोपीने कुणाच्या चिथावणीने अथवा कुणाशी संगनमत करून अथवा अन्य कुणा व्यक्तीशे करार करून अथवा कट करून बहिष्कार टाकलेला नाही असे, न्यायालयाचे (चौकशी अंती) मत झाले तर या कलमांतर्गत बहिष्काराचा गुन्हा घडला असे समजले जाणार नाही.

३) **बहिष्कारास चिथावणी देणारा वा प्रवृत्त करणारा अपराधः—**

एका व्यक्तीविरुद्ध अथवा वर्गाविरुद्ध,

अ) जी व्यक्ती बहिष्काराची सूचना लोकात जाहीर करते, प्रसिद्ध करते अथवा सर्वत्र वितरण करते.

ब) जी एखादे निवेदन, अफवा अथवा अहवाल, बहिष्काराच्या हेतूने अथवा बहिष्कारास कारणीभूत होईल याची जाणीव असूनदेखील, प्रसिद्ध करते अथवा वितरण करते, अथवा

क) अन्य कोणत्याही मार्गाने बहिष्कारास चिथावणी देते आणि प्रवृत्त करते, अशी व्यक्ती बहिष्कारास चिथावणी देणारी व प्रवृत्त करणारी म्हणून या गुन्ह्याच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**स्पष्टीकरणः—** या गुन्ह्यामुळे फटका बसलेली अथवा बसण्याची शक्यता असलेली व्यक्ती, तिच्या अथवा तिच्या वर्गाच्या नावाचा उल्लेख नसला तरी ज्याच्या वागणुकीद्वारे अथवा या वागणुकीपासून विशिष्ट पध्दतीने अलिप्त राहिल्यामुळे, हा गुन्हा घडला 'असे आढळले तरी त्याने गुन्हा केला' असे समजले जाईल.

४) **बहिष्काराच्या धमकीचा अपराधः—** एखाद्या व्यक्तीने कायद्याने मान्य असलेली कृती केली अथवा कायद्याने अमान्य असलेली कृति केली नाही. अशा व्यक्तीस अथवा त्या व्यक्तीशी संबंधित असलेल्या अन्य व्यक्तीस एखाद्याने बेकायदेशीर कृत्य करण्यास प्रवृत्त केले अथवा कायदेशीर कृत्यापासून परावृत्त केले व ते न मानल्यामुळे बहिष्काराची धमकी दिली तर अशी व्यक्ती बहिष्काराच्या अपराधास पात्र ठरेल.

**अपवादः—** खालील कृति बहिष्कार नव्हेः—

( एक) मजुरांच्या न्याय्य लढ्याकरिता केलेली कोणतीही कृति.

(दोन) धंद्यातील सर्वसाधारण स्पर्धेत केलेली कोणतीही कृति.

२) हे सर्व अपराध दखलपात्र गुन्हे "कॉगनिझेबल ऑफेन्सेस" समजल्या जातील.

केंद्र विधीमंडळ या अपराधाकरिता शिक्षा देणारे कायदे तयार करील.

### खंड - ४ (Clause - 4)

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ४२ पहा)

वरीलपैकी कोणत्याही हेतुकरिता अनुदान देण्याचे केंद्र व राज्यसरकारचे अधिकार संकोच पावणार नाहीत अथवा काढले जाणार नाहीत. ज्या संबंधी कायदे करण्याचा राज्याला अथवा केंद्र सरकारला अधिकार आहे अशा बाबींपैकी ही बाब नसली तरीही यापैकी कोणत्याही हेतुकरिता अनुदान देण्याचे केंद्र व राज्य सरकारचे अधिकार कमी करता येणार नाहीत अथवा काढूनही टाकता येणार नाहीत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
शाखा

## अनुच्छेद दोनः भाग - ४

# अनुसूचित जातींकरितां संरक्षणविषयक तरतुदी

### विभाग : १ – हमी

भारतीय संघराज्याचे संविधान अनुसूचित जातींकरिता खालील हक्कांची हमी देईलः—

### खंड - १ (Clause - 1)

### विधानमंडळात प्रतिनिधीत्वाचा अधिकार

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ४२—४८ पहा).

१) **प्रतिनिधीत्वाचे प्रमाणः** एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जातीचे जेवढे प्रमाण असेल, कमीत कमी तेवढे प्रमाण केंद्र व राज्य सरकारच्या विधीमंडळातील अनुसूचित जातींच्या प्रतिनिधीचे राहील. जर काही गटांचे एकत्र संविधान असेल तर त्या गटातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात असलेल्या अनुसूचित जातीच्या प्रमाणा एवढे प्रतिनिधित्व राहील.

(एक) मात्र अन्य कोणत्याही अल्पसंख्य जातीस तिच्या संपूर्ण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधीत्व मागता येणार नाही.

(दोन) सिंध, व वायव्य सरहद्द प्रांतातील अनुसूचित जातींना त्यांचा प्रतिनिधीत्वाचा योग्य वाटा देण्यात येईल.

(तीन) जास्त मोठे जातीय बहुमत कमी करून झुकत्या मापाने वाजवी संख्या करण्याची गरज भासल्यास फक्त बहुसंख्य असणाऱ्या जातींच्याच वाट्यातून हे प्रतिनिधीत्व कमी होईल. कोणत्याही परिस्थितीत अन्य अल्पसंख्य जातींच्या संख्याबळाला याचा धक्का पोचता कामा नये.

(चार) बहुसंख्य जातींच्या घटवलेल्यां प्रतिनिधींचा वाटा एकाच अन्य जमातीस जाणार नाही तर तो वाटा सर्व अल्पसंख्य जमातीत समान वाटला जाईल अथवा व्यस्त प्रमाणात खालीलप्रमाणे वाटप केले जाईल.

(१) आर्थिक स्थान. (२) सामाजिक प्रतिष्ठा. (३) शैक्षणिक प्रगति.

या बाबी लक्षात घेऊन जे जास्त मागासलेले त्यांना जास्त प्रतिनिधीत्वाचा वाटा

व जे कमी मागासलेले त्यांना कमी वाटा देण्यात येईल.

(ब) खास हितसंबंध असलेल्यांना (तत्कालीन जमीनदार, मालगुजार आदि वर्ग) कोणतेही प्रतिनिधीत्व द्यायला नको. परंतु द्यायचेच असेल तर ते प्रतिनिधीत्व, त्यांच्या समाजाच्या सदस्यसंख्येतून देण्यात यावे.

(२) **निवडणूक पध्दती–** (अ) विधानमंडळे

(अ) पुणे कराराने दिलेली निवडणुक पध्दती नष्ट करण्यात यावी.

(ब) तिचे जागी विभक्त मतदार संघ निर्माण करावेत.

(क) प्रौढ मतदानाचा अधिकार असावा.

(ड) संकलित (Cumulative) मतदानाची पध्दती असावी.

**(ब) स्थानिक संस्थाः–** संघसरकार व राज्यसरकारे यांनी स्वीकारलेले प्रतिनिधीत्वाच्या प्रमाणाचे तत्व आणि निवडणुक पध्दती, हे नगरपरिषदा व स्थानिक स्वराज्य संस्था यांनाही लागू होतील.

**खंड - २ (Clause - 2)**

**कार्यकारिणीत मंत्रीमंडळात प्रतिनिधीत्वाचा अधिकार**

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ४८–४९ पहा).

१) अनुसूचित जातींना राज्य व केंद्र सरकारांत त्यांच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व राहील, तथापि कोणत्याही अल्पसंख्य-जातीस तिच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधीत्व मागता येणार नाही.

२) वाजवींपेक्षा जास्त बहुमत असलेल्यांचे प्रतिनिधीत्व कमी करण्याची आवश्यकता असेल त्यावेळी बहुसंख्य असलेल्या जातीच्या वाट्यातूनच ही कपात करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत अन्य अल्पसंख्य जातींच्या प्रतिनिधीत्वास धक्का लावता येणार नाही.

३) बहुसंख्यांकांच्या वाट्यातून केलेली कपात अन्य कोणत्याही एकाच जातीच्या वाट्यास जाणार नाही एकतर ती सर्व अल्पसंख्यांकांना समान वाटली जाईल अथवा खालील बाबी लक्षात घेऊन व्यस्त प्रमाणात विभागली जाईल.

त्यांची आर्थिक परिस्थिती. (२) सामाजिक स्तर आणि (३) शैक्षणिक प्रगती.

**खंड - ३ (Clause - 3)**

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ४९ पहा).

**नोकऱ्यांत प्रतिनिधीत्वाचा अधिकार**

**अ) अनुसूचित जातींचा (शासकीय) सेवेतील प्रतिनिधीत्वाचा वाटा खालीलप्रमाणे राहीलः–**

(एक) **केंद्रीय शासकीय सेवाः–** भारताच्या किंवा ब्रिटीश भारताच्या संपूर्ण लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांचे जे प्रमाण राहील त्या प्रमाणात प्रतिनिधीत्व राहील.

(दोन) **राज्य शासकीय सेवाः–** संघराज्यातील अथवा त्या त्या राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जातीचे जे प्रमाण राहील त्या प्रमाणात त्या प्रमाणात त्यांचे नोकऱ्यातील प्रतिनिधित्व राज्यातील अथवा केंद्रातील शासकीय नोकऱ्यात राहील.

(तीन) **नगरपालिका आणि स्थानीय मंडळातील नोकऱ्याः–** नगरपालिका व लोकल बोर्डाच्या हद्दीतील एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जातीच्या असलेल्या प्रमाणाप्रमाणे सेवेतील प्रतिनिधीत्व राहील.

तथापि सेवेतील प्रमाण लोकसंख्येतील प्रमाणापेक्षा जास्त मागण्याचा कोणत्याही अल्पसंख्य जमातीस अधिकार राहणार नाही.

ब) शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा आदि निम्नतम पात्रतेच्या अटी वगळता अन्य कोणत्याही परिस्थितीत नोकऱ्यांतील प्रतिनिधीत्वाचा हक्क कमी केला जाणार नाही.

क) नोकरीत प्रवेश करण्यासाठी घालण्यात येणाऱ्या नवीन अटींमुळे भारतसरकारने १९४२ व १९४५ च्या ठरावांद्वारे अनुसूचित जातींना दिलेल्या सवलतींत घट होणार नाही.

ड) सरकारी नोकऱ्या भरण्याची पध्दत भारतसरकारच्या १९४२ आणि १९४५ च्या ठरावान्वये केलेल्या नियमांशी सुसंगत राहील.

इ) प्रत्येक लोकसेवा आयोगावर अथवा नोकरीच्या जागा भरणाऱ्या समितीवर अनुसूचित जातीचा कमीत कमी एक तरी प्रतिनिधी राहील.

## विभाग - २

## विशेष जबाबदाऱ्या

**उच्चतर शिक्षणाची तरतूद :–** अनुसूचित जातीच्या उन्नतीकरीता भारतीय संघराज्य खालील विशेष जबाबदाऱ्या स्वीकारलीः–

**खंड – १**

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ४९ पहा).

१) अनुसूचित जातींच्या उच्चतर शिक्षणाची आर्थिक जबाबदारी संघ व राज्य सरकार स्वीकारील आणि त्याकरिता पुरेशी तरतूद आपापल्या वार्षिक अंदाजपत्रकात करील अशी तरतूद केंद्र व राज्य सरकारच्या शिक्षण अंदाजपत्रकाचा "प्रथम भार" (फर्स्ट चार्ज) म्हणून समजली जाईल.

२) भारतातील अनुसूचित जातींच्या माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणासाठी पैशाची तरतूद करण्याची जबाबदारी राज्यसरकारांची राहील व प्रत्येक राज्यसरकार आपल्या राज्याच्या अंदाजपत्रकात त्यांच्या शिक्षणाकरिता एकूण लोकसंख्येशी असलेल्या अनुसूचित जातीच्या प्रमाणा एवढी रक्कम राखून ठेवील.

३) अनुसूचित जातींच्या परदेशातील शिक्षणाकरिता पैशाची तरतूद करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची राहील आणि केंद्र सरकार या कामाकरिता दरवर्षी दहा लाख रुपयांची आपल्या अंदाजपत्रकात तरतूद करील.

४) राज्य सरकार राज्यातील लोकांच्या प्राथमिक शिक्षणाच्या विकासाकरिता जो खर्च करील त्यातील अनुसूचित जातीच्या वाट्याला आलेल्या रकमेला या विशेष खर्चामुळे बाधा येणार नाही.

**खंड - २**

**वसाहतींची तरतूद** (स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ४९–५१ पहा.)

संघसरकारच्या संविधानात खालील तरतुदी करण्यात येतीलः–

१) नवीन संविधानात एक "वसाहत आयोगाची" तरतूद ("सेटलमेंट कमिशन") राहील तो राज्यातील वहितीखील नसलेली जमीन स्वतःकडे विश्वस्त म्हणून ठेवून त्यावर अनुसूचित जातींच्या स्वतंत्र वसाहती स्थापन करील.

( एक) वसाहतीची योजना राबविण्याकरिता केंद्र सरकार दरवर्षी ५ कोटी रूपये वेगळे राखून ठेवील.

(दोन) आयोगाला कोणतीही जागा विकत घेण्याचा व तिचा वसाहतीच्या कार्याकरिता उपयोग करण्याचा अधिकार राहील.

२) आयोगाला आपले कार्य सुरळीत पार पाडता यावे म्हणून केंद्र सरकार वेळोवेळी आवश्यक ते कायदे करील.

## विभाग - ३

### संरक्षण विषयक तरतुदींची शाश्वती, आणि दुरूस्ती

भारतीय संघराज्याचे संविधानाबाबत खालील तरतुदी राहतील:–

### खंड - १

**संरक्षणविषयक तरतुदींवरील बंधने**

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ५१–५२ पहा).

उपरोक्त अनुच्छेद - २ (Article - 2) भाग - ४ (Section ½ IV) मधील संरक्षणविषयक तरतुदींना 'संविधानात स्थान देण्याचे आणि भारतीय संविधान कायद्याचा भाग म्हणून स्विकारण्याचे, भारतीय संघराज्य मान्य करते.

### खंड - २

**तरतुदींच्या दुरुस्तीची प्रक्रिया** (स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ५२–५३ पहा).

अनुसूचित जातींच्या तरतुदींत, खाली दर्शविलेल्या पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही रीतीने, बदल, दुरूस्ती अथवा संकोच केला जाणार नाही.

अनुच्छेद २ च्या भाग ४ अथवा अनुसूचित जाती संबंधी त्यातील कोणताही भाग दुरूस्त अथवा संकोच करायचा असेल तर तशा प्रकारचा ठराव केंद्रीय विधिमंडळाच्या जास्त लोकाभिमुख सभागृहाद्वारे खाली नमूद केलेल्या पध्दतीप्रमाणे संमत व्हायला हवा:–

(एक) दुरूस्ती अथवा संकोच करणारी सूचना संघविधानमंडळाच्या जास्त लोकाभिमुख सभागृहात ठरावाच्या स्वरूपात सादर करण्यात येईल.

(दोन) असा ठराव तोपर्यंत प्रस्तुत करण्यात येणार नाही, जोपर्यंत

(अ) संविधान अंमलात येऊन व त्याची अंमलबजावणी होऊन २५ वर्षांचा कालावधी लोटलेला आहे. आणि

(ब) असा ठराव प्रस्तुत करणाऱ्या सभागृहाच्या सदस्यांने आपला मनसुबा व्यक्त करणारी पूर्वसूचना सहा महिन्यापूर्वी सभागृहाला दिलेली आहे.

(तीन) असा ठराव संमत होताच, विधानमंडळ बरखास्त करण्यात येईल व नवीन निवडणुका घेण्यात येतील.

(चार) नवनिर्वाचित केंद्र विधीमंडळाच्या त्याच सभागृहासमोर मूळ ठराव जसाच्या तसा पुन्हा मांडण्यात येईल.

(पाच) हा ठराव संमत झाला असे तोपर्यंत समजले जाणार नाही जोपर्यंत सदरहु ठराव सभागृहाच्या दोन तृतीयांश बहुमताने आणि स्वतंत्र मतदारसंघाद्वारे निवडून आलेल्या अनुसूचित जातींच्या प्रतिनिधींच्या दोन तृतीयांश सदस्यांनी मंजूर करण्यात येत नाही.

३२८६ ७५५७३१ २२।१५।८८

## विभाग - ४

### भारतीय संस्थानात अनुसूचित जातींचे संरक्षण

### भारतीय संस्थानात अनुसूचित जातींच्या संरक्षणार्थ सवलती

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ५१ पहा.)

भारतीय संस्थानास खालील अटींवर भारतीय संघराज्यात प्रवेश दिला जाईल, अशी तरतूद भारतीय संविधानात करण्यात येईलः—

अनुसूचित जातींना लागू असलेले भारतीय संघराज्याच्या संविधानातील अनुच्छेद २ विभाग चार (Part - 4) मधील तरतुदी भारतीय संस्थानातील अनुसूचित जातींना देखील लागू होतील. संघराज्यात प्रविष्ट होण्यापूर्वी भारतीय संविधानातील ही अट मान्य केल्यावाचून संस्थानाला संघराज्यात प्रवेश दिला जाणार नाही.

## विभाग पाचः अन्वयार्थ

**अस्पृश्य हे अल्पसंख्य** (स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ५२ पहा.)

१) भारत सरकारच्या १९३५ च्या कायद्यांतर्गत निघालेल्या "गव्हर्मेंट ऑफ इंडिया शेड्युल्ड कास्ट ऑर्डर १९३६" मधील अनुसूचित जातीच्या व्याख्येनुसार 'अनुसूचित जाती' या अनुच्छेद या करीता अल्पसंख्य समजल्या जातील.

### अस्पृश्य आणि त्यांचे स्थलांतरामुळे बदललेले वास्तव्य

(स्पष्टीकरणार्थ पृष्ठ ५३ पहा).

२) अनुच्छेद २ मधील तरतुदींसाठी एका राज्यातील अनुसूचित जाती या भारतातील अन्य सर्व राज्यांकरिता अनुसूचित जाती मानल्या जातील.

## परिशिष्ट एक

## स्पष्टीकरणात्मक टीपा

## प्रास्ताविका

घटना समितीने बुधवार दि. २२ जानेवारी १९४७ रोजी मंजूर केलेल्या उद्दीष्टांसंबंधींच्या ठरावास ही प्रास्ताविका संवैधानिक आकार व स्वरूप प्रदान करते.

### अनुच्छेद — १ : भाग - १
### Article I - Section I
### खंड १ ते ४ (Clause 1 to 4)

सुमारे ६००च्या वर संख्या असलेल्या भारतीय संस्थानांचा संघराज्यातील प्रवेश अनेक बिकट प्रश्न निर्माण करतो. सर्वात किचकट असा प्रश्न म्हणजे त्यांचा संघराज्यातील प्रवेश हाच होय. प्रत्येक भारतीय संस्थान हे स्वतःला सार्वभौम राज्य समजते. आणि स्वतःच्या विशिष्ट अधिकारांतर्गतच संघराज्यात स्थान ठेवण्याची मागणी करते. भारतीय संस्थानाचा आकार, लोकसंख्या, महसूल आणि उत्पन्नाची अन्य साधने लक्षात घेता या संस्थानांचे निरनिराळे वर्ग पडतात. कोणतेही संस्थान संघराज्यात शांतता राखण्याकरता आवश्यक असणाऱ्या आधुनिक प्रशासकीय यंत्रणेचा भार उचलण्यास समर्थ असायला हवे हे उघड आहे. तसेच त्या राज्यातील लोकांच्या आर्थिक उन्नती करिता आवश्यक असणारी साधनेही त्या राज्याजवळ असायला हवींत. तसे नसल्यास भारतीय संघराज्य हे केंद्र सरकारला मदत करणाऱ्या घटक राज्यांचे असण्यापेक्षा अनेक दुर्बल घटक राज्यांचे निर्माण होईल व ही राज्ये सतत भारतीय संघराज्याला डोईजड ठरतील. अशा लहान व दुर्बल घटक राज्यांमुळे केंद्र सरकार आणीबाणीच्या प्रसंगी आपले सामर्थ्य पूर्णपणे पणास लावू शकणार नाही. प्रत्येक भारतीय संस्थान प्रशासन चालविण्यास आणि अंतर्गत शांतता राखण्यास समर्थ आहे की नाही याची पूर्ण तपासणी न करता संघराज्यात समाविष्ट करण्यात आले तर भारताच्या सुरक्षिततेस भविष्यात भयानक धोका उद्भवू शकतो, हे उघड आहे. हा धोका टाळण्याकरिता या अनुच्छेदाद्वारे भारतीय संस्थानांचे दोन वर्गात वर्गीकरण केलेले आहे.

१) पात्र भारतीय संस्थाने आणि २) अपात्र भारतीय संस्थाने. असे सुचविण्यात आले

आहे की, भारतीय संस्थानांचे संघराज्यात विलीनीकरण करण्यापूर्वी पात्र भारतीय संस्थानांची यादी तयार करणे ही पहिली महत्त्वाची बाब आहे. पात्र भारतीय संस्थानाने विलीनीकरणाचा अर्ज दिल्यानंतर आणि तत्संबंधी प्रास्तावित कायद्यातील तरतुदींची (Enabling Act)पूर्ती केल्यानंतर संघराज्यात त्याला समाविष्ट करण्यात येईल. त्या राज्याचे अंतर्गत शासन चालवण्याकरता हा प्रस्तावित कायदा तयार करण्याचा पूर्ण अधिकार भारतीय विधान मंडळास राहील व असा कायदा भारतीय संघराज्याच्या संविधानातील तत्वांशी सुसंगत राहील. अपात्र भारतीय संस्थानांच्या ताब्यातील भूप्रदेश भारतीय संघराज्याचे भूप्रदेश म्हणून समजण्यात येतील. आणि भारतीय संघराज्यांमार्फत त्यांची योग्य त्या आकारात पुनर्रचना करण्यात येईल. या कालावधीत त्या त्या भूप्रदेशाचे संस्थानिक अथवा राज्यकर्ते भारतीय संघराज्यांच्या देखरेखीखाली आपापल्या प्रदेशाचा कारभार पहातील. भारतीय सरहद्दीतील ब्रिटीश भारतीय प्रांत असो अथवा भारतीय संस्थाने असोत, हे सर्व भूप्रदेश या कायद्यानुसार एकात्म म्हणून जाहीर करण्यात येतील. जरी यातील एखादे भारतीय संस्थान संघराज्यात प्रविष्ट झाले नाही तरी ते या एकात्म संघराज्याचा भाग राहील. खंड ४ (Clause - 4, अनुसार एखादे संस्थान संघराज्यात एकदा समाविष्ट झाले की त्याची एकात्मता कायम राखण्यात येईल आणि त्याची विभागणी या खंडातील तरतुदी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकाराने करण्यात येणार नाही.

**अनुच्छेद — १ भाग — १** (Article - I : Part 2)

खंड १ आणि खंड - २ (Clause - 1 and Clause - २)

जी संस्थाने स्वतंत्र आहेत परंतु भारताच्या सीमेवर आहेत आणि त्यांना संघराज्यात विलीन व्हायची इच्छा आहे, त्यांना समाविष्ट करून घेण्याचा खंड १ द्वारे भारतीय संघराज्याला अधिकार प्राप्त होतो.

खंड २ द्वारे भारतीय संघराज्यास भूभाग प्राप्त करण्याचा व तो संघराज्यात समाविष्ट करण्याचा अथवा त्याला स्वतंत्र भूभाग म्हणून समजण्याचा अधिकार प्राप्त होतो.

## Article 2 — Section 1

## अनुच्छेद २ : भाग - १

संविधानात मूलभूत अधिकारांचा समावेश करण्याबद्दल समर्थन करण्याची आवश्यकता नाही. सर्व जुन्या आणि नवीन राज्य घटनांमध्ये मूलभूत अधिकारांची संविधानात आवश्यकता मान्य केलेली आहे. निरनिराळ्या देशातील विशेषतः ज्या देशातील परिस्थिती भारतातील परिस्थितीशी मिळती जुळती आहे अशा देशांच्या संविधानात या अनुच्छेदात दर्शविलेले मूलभूत अधिकार स्वीकारलेले आहेत.

## अनुच्छेद २ · भाग - २

खंड - १

अधिकारांसोबत उपाय असतील तरच ते अधिकार खरे समजावेत. एखाद्याच्या अधिकाराचे अतिक्रमण झाले परंतु त्याला स्वतःवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्याकरता कायदेशीर उपाय नसेल तर अशा अधिकारांचा काहीच उपयोग नाही. ज्याअर्थी संविधानात अधिकारांची हमी दिलेली आहे त्याअर्थी विधानमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांचेकडून होणाऱ्या अधिकारातिक्रमणास प्रतिबंध करण्याची तरतूद असणे हे क्रमप्राप्त आहे. हे कार्य साधारणपणे न्याय संस्थेला देण्यात येते आणि संविधानाने नागरिकांना दिलेल्या अधिकारांचे संरक्षण करण्याकरता न्यायालये पालकत्वाची खास जबाबदारी स्वीकारीत असतात. प्रस्तुत खंड यापलीकडे कोणतीही तरतूद करीत नाही. या खंडातील तरतुदीद्वारे कार्यकारी मंडळाच्या अत्याचारापासून नागरिकांचे संरक्षण व्हावे म्हणून न्यायसंस्थेला कार्यकारी मंडळाच्या अधिकारातिक्रमणाची सविस्तर चौकशी करण्याचे विशेष अधिकार प्रदान करण्याचे सुचविले आहे. यालाच न्यायालयीन भाषेत रीट अथवा प्राधीलेख असे म्हणतात. भारतातील उच्च न्यायालयांना हे अधिकार भारत सरकार आणि त्यांच्या 'लेटर्स पेटेंट' मार्फत प्राप्त झालेले आहेतच. परंतु या अधिकाराच्या दुहेरी मर्यादा आहेत. पहिल्याप्रथम 'लेटर्स पेटेंट'मार्फत मिळालेले अधिकार हे फक्त प्रेसीडेंसी टाऊन्स मधील हायकोर्टांनाच आहेत. अन्य कोणत्याही हायकोर्टांना नाहीत. दुसरे असे की, या अधिकारांना भारतीय विधीमंडळांनी केलेल्या कायद्याचे बंधन आहे. तिसरी बाब म्हणजे १९३५ च्या भारत सरकार कायद्यांतर्गत दिलेले अधिकार मर्यादित आहेत आणि अन्यायपीडित व्यक्तीला संरक्षण देण्यास हे अधिकार अपुरे पडण्याची शक्यता आहे. प्रस्तुत खंडातील तरतुदींचा हेतू दुहेरी आहे.

१) ज्याला इंग्लीश कायद्यात 'प्रीरोगेटीव्ह रीट्स' म्हणजे 'विशेष हक्काचा प्राधिलेख' म्हणतात, तो काढण्याचा संपूर्ण अधिकार न्यायसंस्थेला प्रदान करणे.

२) विधानमंडळाला कोणत्याही परिस्थितीत (न्यायालयाचे) हे अधिकार संकुचित करण्यापासून प्रतिबंधित करणे.

**खंड - २**

भारतासारख्या देशात बुहतेक व्यक्ती जातीय मनोवृत्तीच्या आहेत. त्यापैकी अधिकारात असलेल्या व्यक्ती, जे त्यांच्या जाती जमातीचे नाहीत, त्यांना समानतेची वागणूक देतील अशी अपेक्षा करणे कठीण आहे. भारतात पक्षपाती वागणूक ही अस्पृश्यांच्या पाचवीला पूजिलेली आहे. मद्रास सरकारच्या बोर्ड ऑफ रेव्हेन्यूच्या क्र. ७२३, दि. ५-११-१८९२ च्या इतिवृत्तातील खालील उताऱ्यावरून हिंदु अधिकाऱ्यांकडून अस्पृश्य जातींना पक्षपाती वागणूक कशी मिळते हे दिसून येईल.

अहवालात म्हटले आहे:—

"१३४ अत्याचारांचे जे नमूने यापूर्वी सूचित केलेले आहेत त्यातील काही थोडक्यात सांगता येतील. आपल्या हुकुमांची अंमलबजावणी "परीया" (अस्पृश्य) जातीच्या माणसांनी केली नाही तर त्यांचे मालक —

अ) ग्राम न्यायालयात अथवा फौजदारी न्यायालयात खोटे दावे दाखल करतात.

ब) अर्ज करून सरकारकडून गावाभोवतीची पडीत जमीन प्राप्त करतात, जेणे करून त्यांची जनावरे कोंडवाड्यात टाकता यावीत. अथवा "परीयां"ना स्वतःचे देवळात जाण्याचे रस्ते बंद करतात.

क) खातेदारांच्या हक्कनोंदणीत "परीयां"च्या जागी स्वतःची नांवे घुसवतात.

ड) अस्पृश्यांच्या झोपड्या पाडतात आणि त्यांच्या परसातील पिके नष्ट करतात.

इ) परंपरेने चालत आलेले कुळाचे जमिनीवरील वहीतीचे अधिकार त्यांना नाकारतात.

फ) "परीयां" (अस्पृश्यां) ची पिके जबरदस्तीने कापून नेतात व कुणी प्रतिबंध केलाच तर त्याचेच विरुद्ध चोरी व दंग्याधोप्याचे आरोप ठेवतात.

ग) त्यांचेकडून खोट्यानाट्या सबबीखाली खोटे दस्तैवज तयार करवून घेतात जेणे करून त्यांचा कायमचा सर्वनाश ओढवतो.

ह) त्यांच्या शेतीला जाणाऱ्या पाण्याचे पाट तोडतात.

य) कायदेशीर नोटीस न देता जमीन मालकाचा बाकी महसूल वसूल करण्याकरता पोट कुळांची संपत्ती जप्त करतात.

"१३५, या गुन्ह्याचा प्रतिकार करण्याकरता दिवाणी व फौजदारी न्यायालये आहेत असे सांगण्यात येईल. ही न्यायालये आहेत यात शंका नाही, परंतु त्यांचा या बाबतींत काहीच उपयोग नाही. कोर्टात जाण्यासाठी व्यक्तीला धैर्य पाहिजे. वकील करण्याकरता व कोर्टाच्या कामकाजासाठी पैसा हवा आणि दावा सुरू असेपर्यंत अथवा अपील संपेपर्यंत उदर निर्वाहाचे साधन हवे. पुष्कळशा केसेस पहिल्याच कोर्टाच्या निवाड्यावर अवलंबून असतात आणि या न्यायालयातील न्यायाधीश व कर्मचारी बहुधा भ्रष्ट असतात, शिवाय ते श्रीमंत आणि जमीनदार अशा वर्गातून आल्यामुळे हे त्यांनाच सहानुभूती दर्शवितात."

"१३६, स्पृश्य वर्गाचा सरकारी अधिकाऱ्यांवरील प्रभाव कल्पनातीत असतो. या वर्गाचा स्वकीय अधिकाऱ्यांवर तर प्रभाव असतोच परंतु युरोपियन अधिकाऱ्यांवरही चांगलाच असतो. प्रत्येक कार्यालयात वर पासून खालपर्यंत. यांचीच माणसे असतात आणि कोणतेही काम प्रारंभापासून शेवटच्या अंमलबजावणीपर्यंत स्वजातीच्या हिताकरता आपल्यातर्फे करवून घेण्याचे सामर्थ्य या जातीत असते."

विधानमंडळाद्वारे अस्पृश्यांना विषमतेची वागणूक कशी मिळते याचे आणखी एक उदाहरण म्हणजे "पंजाब लँड ॲलिएनेशन ॲक्ट", हा कायदा होय.

बहुसंख्य जातींकडून अन्य अनेक अल्पसंख्य जातींना अशा प्रकारचा छळ सहन करावा लागत असेल म्हणून सर्व नागरिकांना कायदा, नियम आणि निर्बंध यांचा समान

लाभ मिळावा म्हणून अशा प्रकारची तरतूद करणे आवश्यक आहे.

युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिकेच्या काँग्रेसने निग्रोंना विषम वागणूकींपासून संरक्षण देण्यासाठी मंजूर केलेल्या सिव्हील प्रोटेक्शन अॅक्ट १८६६ आणि १ मार्च १८७५ चा कायदा या वरून या खंड २ मधील तरतूद घेतली आहे.

**खंड - ३**

जर मूलभूत अधिकार हे वास्तव अधिकार ठरायचे असतील तर जातीभेद हा या देशातील भस्मासूर आहे हे लक्षात घ्यायला हवे. मूलभूत अधिकार हे वास्तव अधिकार ठरायचे असल्यास जातीभेदापासून प्रत्येकाला संरक्षण मिळायला हवे. भारतासारख्या देशात, जातीभेदामुळे लोकांना मोठ्या प्रमाणात पक्षपाती वागणूक मिळण्याचा संभव आहे आणि हा पक्षपात बिनदिक्कत सुरू राहिला तर मुलभूत अधिकारांना मुळीच अर्थ उरणार नाही. नुकतेच अमेरिकन काँग्रेसने असेच एक बिल सादर केले. ज्याचा उद्देश निग्रोंवर होणाऱ्या पक्षपातापासून त्यांचे संरक्षण करणे असा आहे. त्याच धर्तीवर या खंडात तरतूद केलेली आहे.

**खंड - ४**

या खंडामागील मुख्य उद्देश राज्यावर लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियमन करण्याचे बंधन टाकणे असा आहे. राज्याने खाजगी उद्योगांचे कोणतेही मार्ग बंद न करता लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियमन करून अत्युच्च उत्पादन गाठणे आणि संपत्तीचे समान वितरण करणे असा या तरतुदीचा हेतू आहे. या खंडात मांडलेल्या योजनेत शेतीचे राष्ट्रीकरण, सामुदायिक पद्धतीचा कृषी उद्योग तसेच उद्योगधंद्यात सुधारीत असा राज्य समाजवाद सुचविलेला आहे. या तरतुदी द्वारे शेतीकरीता तसेच उद्योगधंद्यांना आवश्यक असलेले सर्व भांडवल पुरविण्याची जबाबदारी राज्याच्या खांद्यावर येते. राज्याने भांडवलाचा पुरवठा केल्याशिवाय शेती अथवा उद्योग यांचेकडून विशेष लाभ अपेक्षिता येणार नाही. या खंडाद्वारे विम्याचे राष्ट्रीयीकरण देखील करण्याचे सुचविले आहे. यांचा हेतू दुहेरी आहे. राष्ट्रीय योजनेद्वारे खाजगी विमाकंपनी पेक्षा व्यक्तीला जास्त सुरक्षिततेची हमी मिळते, कारण राज्याजवळ असलेल्या उत्पन्नाच्या साधनांमुळे आपल्या विम्याचे पैसे अंतिमतः परत मिळणार याची विमा धारकाला खात्री असते. राज्याला देखील आर्थिक नियोजन करण्याकरता लागणाऱ्या पैशाचा एक मार्ग प्राप्त होता. एरवी राज्याला जास्त व्याजाचे अन्य बाजारपेठेतून कर्ज घ्यावे लागेल. भारताच्या जलद औद्योगिकरणाकरता राज्य समाजवाद अत्यावश्यक आहे. खाजगी उद्योगधंदे हे कार्य करू शकत नाहीत. आणि जर त्यांनी केले तर युरोपमध्ये खाजगी भांडवलदारीमुळे ज्याप्रमाणे विषमता निर्माण झाली त्याच विषमतेला

भारताला तोंड द्यावे लागेल. सबब भारतीयांनी हा धोक्याचा इशारा ओळखावा. भूखंडांचे एकत्रीकरण (consolidation)आणि कुळकायदे हे दोन्ही उपाय कुचकामी आहेत. शेतीच्या धंद्यात हे उपाय सुबत्ता आणू शकत नाहीत. भूसंधारण (Consolidation) अथवा कूळकायदा सहा कोटी अस्पृश्यांना, जे मुळातच भूमिहीन आहेत, त्यांना मुळीच सहाय्यभूत ठरू शकत नाही. भूसंधारण अथवा कूळकायदा त्यांचे कोणतेच प्रश्न सोडवू शकत नाहीत. या मसुद्यात सुचविलेल्या मार्गाने सामुदायिक शेती हीच काय ती त्यांना सहाय्यभूत ठरेल. या उपायात अन्य कुणाचा मालकी हक्क हिरावून घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे या सूचनेस कोणाचाही आक्षेप असण्याचे कारण नाही.

या योजनेची दोन वैशिष्ट्ये आहेत. पहिली म्हणजे आर्थिक जीवनाच्या महत्वाच्या क्षेत्रांत या तरतुदींद्वारे राज्यसमाजवाद सुचविण्यात आलेला आहे. दुसरे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे राज्य समाजवादाची स्थापना विधानमंडळाच्या मर्जीवर सोपवलेली नाही. राज्यसमाजवाद हा संविधानाच्या कायद्यानुसार निर्माण होणार आहे. आणि त्यामुळे विधानमंडळ अथवा कार्यकारिणी यांच्या कोणत्याही कायद्याने राज्यसमाजवादाला बदलता येणार नाही.

संवैधानिक कायद्याच अभ्यासक ताबडतोब याविरुद्ध आक्षेप घेतील. ते नक्की विचारतील - आपली सूचना सर्वसाधारण मूलभूत अधिकारांच्या मर्यादेबाहेरील नाही काय? याला माझे उत्तर 'नाही' असे आहे. त्यांना तसे वाटते, याचे कारण असे की, मूलभूत अधिकाराची त्यांनी केलेली संकल्पना अगदी संकुचित अशी आहे. याही पलीकडे जाऊन असे म्हणता येईल की, संवैधानिक कायद्याच्या मर्यादेचा संकुचित वापर केला आणि त्यालाच मुलभूत अधिकार समजले तरीही माझ्या सूचनेला पुरेसे समर्थन प्राप्त होईल. शेवटी समाजाची आर्थिक जडणघडण कशी असावी हे ठरविणारे कायदे करण्याचा हेतू काय? एका व्यक्तीचे स्वातंत्र्य दुसऱ्या व्यक्तीकडून नष्ट होऊ नये म्हणून त्यास संरक्षण देणे आणि हाच हेतू मुलभूत अधिकार निर्माण करण्यामागेहि असतो. व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि समाजाच्या आर्थिक जडणघडणीचे स्वरूप यांच्या परस्पर संबंधाची प्रत्येकाला कल्पना येत नाही. परंतु या दोहोंतील संबंध अतिशय वास्तव असतात. खालील बाबी लक्षात घेतल्यावर ही गोष्ट समजू शकेल.

राजकीय लोकशाही चार गृहित तत्वांवर उभी असते. ती खालीलप्रमाणेः—

( एक)- व्यक्तीचे अंतिम साध्य व्यक्तिविकास हाच असतो

(दोन)- व्यक्तीला अविभाज्य असे काही अधिकार असतात ज्याच्या सरक्षणाची हमी संविधानाद्वारे त्याला मिळायला हवी.

(तीन)– घटनेने व्यक्तीला दिलेले अधिकार काही सवलतींच्या माबदल्यात नष्ट व्हायला नको.

(चार)- कोणत्याही खाजगी व्यक्तीस दुसऱ्यावर सत्ता गाजविण्याचा अधिकार राज्यातर्फे देण्यात येणार नाही.

खाजगी उद्योगधंदे आणि व्यक्तिगत लाभाच्या तत्वावर आधारलेली जी

सामाजिक अर्थव्यवस्था असते त्यात वरील पैकी शेवटच्या दोन तत्वांचे उल्लंघन जरी होत नसले तरी त्यांना गौणत्व मात्र प्राप्त होते हे लक्षात येईल. स्वतःचे जीवन जगण्याकरता किती तरी जणांना आपले घटनात्मक अधिकार सोडून द्यावे लागतात की नाही? किती तरी जणांना खाजगी मालकाच्या अधिपत्याखाली गुलामासारखे जीवन कंठावे लागते की नाही?

जे लोक बेकार आहेत त्यांना विचारा की, ज्यांना आपण मूलभूत अधिकार म्हणतो त्याचा त्यांना काही उपयोग आहे काय? एखाद्या बेकार व्यक्तीला एकीकडे साधारण प्राप्तीची एखादी नोकरी, थोडाफार पगार आणि कामाच्या तासाचे बंधन नाही असे काम आणि दुसरीकडे युनियनचे सदस्यत्व, भाषण स्वातंत्र्य, धर्म—स्वातंत्र्य वगैरे, या दोहोपैकी एकाची निवड करण्यास सांगितले तर तो काय निवडेल? निवड स्पष्ट आहे. उपाशी तडफडण्याची भीती, राहण्यास निवारा नसणे, बचत देणारे उत्पन्न, शाळेत जाणाऱ्या मुलांचे शिक्षण, लोकांच्या दयेवर जगण्याची पाळी, लोकांच्या पैशावर मेल्यानंतर देखील जाळून अथवा गाडून घेण्याची पाळी या सर्व भीतीपोटी हा माणूस नोकरी पत्करेल व मुलभूत अधिकारांचा विचारही करणार नाही हे उघड आहे. तो निव्वळ आपल्या जगण्याचा आणि नोकरीचा तेवढा विचार करेल.

अशा प्रकारे बेकार माणसाला कामाच्या सवलती मिळाव्या आणि जगता यावे म्हणून आपल्या मुलभूत अधिकारांचे बलिदान करावे लागते हे उघड आहे.

जे नोकरीला आहेत त्यांचे काय? संविधान तज्ज्ञ वकील असे गृहित धरतात की, मूलभूत अधिकार निव्वळ अंतर्भूत केले म्हणजे स्वातंत्र्याचे आपोआप रक्षण होते आणि काहीही करावे लागत नाही. ते म्हणतात, लोकांच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नाच्या खाजगी व्यवहारात राज्य सरकार हस्तक्षेप करीत नसेल तर स्वातंत्र्य आपोआप प्राप्त होते. राज्याचा हस्तक्षेप कमीत कमी करणे व स्वांतत्र्य जास्तीत जास्त उपलब्ध करून देणे हे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी राज्य हस्तक्षेप करीत नाही तेथे अर्थातच जास्त स्वातंत्र्य असते हे खरे आहे. परंतु यामुळे सर्व प्रश्न सुटतात असे नाही. एक प्रश्न उरतोच. शेवटी हे स्वातंत्र्य आहे तरी कुणासाठी? अर्थात हे जे स्वातंत्र्य असते ते शेतजमीनदारांना भाडे वाढविण्यासाठी, भांडवलदारांना कामाचे तास वाढविण्यासाठी आणि कामाचे तास वाढवून मजुरांच्या मजुरीचे दर कमी करण्यासाठी असते. असे होणे अपरिहार्य आहे. अन्य कोणताही परिणाम असंभव आहे. ज्या अर्थव्यवस्थेत मजुरांची सेना मोठ्या प्रमाणात सामुहीकरीत्या वस्तूचे उत्पादन करीत असते, त्या व्यवस्थेत कामगारांनी सतत काम करीत रहावे आणि उद्योगाचे चाक फिरत रहावे या करिता कुणीतरी नियम करायलाच हवा. जर राज्यसत्तेने हे नियम केले नाहीत, तर खाजगी भांडवलदार मालक ते करील अन्यथा आयुष्य जगणे कठीण होईल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे राज्य सत्तेच्या बंधनातून मुक्त असे स्वातंत्र्य ज्याला म्हणतो ते खाजगी भांडवलदारांच्या हुकुमशाहीचे दुसरे नांव आहे.

हे घडू नये म्हणून काय उपाय करावा? नोकरी असलेल्यांना तसेच बेकारांना

देखील त्यांचे जीवित, स्वातंत्र्य आणि सुख प्राप्तीच्या साधनांचा उपभोग घेण्याकरता लाभलेल्या मूलभूत अधिकारांचे नाडवणुक करणाऱ्या वर्गापासून संरक्षण कसे करता येईल याचा विचार व्हायला हवा. लोकशाही देशामध्ये यावर काही उपाय योजिलेले आहेत. राजकीय क्षेत्रात बंधने टाकणाऱ्या शासनाच्या अधिसत्तेला पायबंद घालण्यात आलेले आहेत. सामान्य दुर्बल व्यक्तीवर आर्थिक क्षेत्रात प्रबळ व्यक्तीकडून मनमानी बंधने टाकण्याच्या प्रवृत्तीला लगाम घालण्याचा सामान्य अधिकार लोकशाही देशामध्ये विधानमंडळाला देण्यात येतो. ही योजना किती अपरिपक्व व निरूपयोगी आहे हे सिद्ध झालेले आहे. विधानमंडळासारखी अल्प अधिकार असलेली संस्था याबाबतीत कितपत मर्यादा घालू शकेल हे सांगणे कठीण आहे. प्रौढ मतदान पद्धतीने निवडून आलेली विधानमंडळे आणि सरकारें देखील (आर्थिक दृष्ट्या) जास्त प्रबळ अशा शक्तींच्या हातातली बाहुली असतात. ही गोष्ट लक्षात घेता विधानमंडळाला दुर्बलांच्या स्वातंत्र्याचे रक्षणाकरता धावून जाण्याचे आवाहन करणे अतिशय भाबडेपणाचे आहे. प्रस्तुत योजना अगदी वेगळा उपाय सुचविते. सरकारतर्फे बंधने टाकण्याचे स्वैर अधिकार ही योजना तर थोपवतेच एवढेच नव्हे तर जास्त प्रबळ व्यक्तींच्या दुर्बलाविरुद्ध मनमानी घालण्यात येणाऱ्या बंधनांना निव्वळ मर्यादाच घालते असे नाही तर बंधने घालण्याची शक्यताही नष्ट करते व अशा तऱ्हेने दुर्बलांचे आर्थिक स्वातंत्र्य अबाधित राखते. या दृष्टीने पहाता प्रस्तुत योजना ही दुर्बल घटकांच्या हक्क व स्वातंत्र्यावर प्रबळ घटकांकडून होणाऱ्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यास जास्त परिणामकारक आहे याबद्दल शंका असू नये. वरील गोष्टी विचारात घेता हा प्रस्ताव व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा मूलतः संरक्षक आहे. म्हणून कोणताही संविधान पंडीत वकील निव्वळ या कारणाकरता की ही योजना घटनात्मक कायद्याच्या नियमबाह्य आहे, याला आक्षेप घेऊ शकत नाही.

आतापर्यंत वरील योजना ही व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या रक्षणाकरता एक उपाय म्हणून चर्चिली गेली. परंतु या व्यतिरिक्त या योजनेचा दुसराही हेतू आहे, जो लक्षात घेण्यासारखा आहे. संसदीय लोकशाहीचा संकोच न करता आणि संसदीय लोकशाहीच्या मर्जीवर राज्य समाजवादाच्या स्थापनेची धुरा न सोपवता राज्य समाजवाद स्थापन करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

राज्य समाजवादाचे टीकाकारच नव्हे तर समर्थक देखील असे विचारतात की, राज्य समाजवादाला संविधानकायद्याचे अविभाज्य अंग का करण्यात यावे? कायदा तयार करण्याच्या सर्वसाधारण पद्धतीनेच राज्य-समाजवाद आणण्याचा कायदा करण्याचे विधानमंडळावर कां सोपवू नये? सामान्य कायद्यावर हे कांम कां सोपविलेले नाही हे समजणे फारसे कठीण नाही. योजनाबद्ध अर्थव्यवस्थेच्या यशाचे एक आवश्यक अंग म्हणजे कोणतीही योजना मध्येच बारगळता येणारी अथवा लोंबकळत राहणारी नसावी. ती स्थायी स्वरूपाची असावी. प्रश्न असा आहे की हे स्थायी स्वरूप कसे प्राप्त करायचे? संसदीय लोकशाही ज्याला म्हणतात त्या सरकारमध्ये हे उद्दिष्ट साध्य करणे अशक्य

आहे. संसदीय लोकशाहीमध्ये विधानमंडळ आणि कार्यकारिणी या उभयतांचे धोरण काही काळाकरिता तरी बहुसंख्यांकांचे धोरण असते. संसदीय लोकशाहीमध्ये एका निवडणुकीत बहुसंख्य लोक उद्योगधंदे व कृषी-उद्योग यांच्यात राज्य-समाजवाद राबवण्यास राजी होतील. तर दुसऱ्याच निवडणुकीत ते या योजनेच्या विरोधात उभे ठाकण्याची संभावना नाकारता येत नाही. राज्य-समाजवादाचे विरोधक आपली कायदे-बनवणारी विधानमंडळातील ताकद, राज्य-समाजवादी शक्तींनी बहुमताने केलेले कायदे मोडण्यास खर्ची घालतील. तसेच राज्य-समाजवादाचे पुरस्कर्ते त्यांच्या विरोधकांनी राज्य-समाजवाद विरोधी केलेले कायदे नष्ट करण्यास आपल्या शक्तीचा उपयोग करतील. ज्यांना संपूर्ण समाजाची आर्थिक घडी राज्य-समाजवादाच्या तत्वांवर उभारायची आहे त्यांनी एक बाब ध्यानात ठेवलीच पाहिजे ती म्हणजे एवढे महत्वाचे उद्दिष्ट साध्य करण्याचे काम "सामान्य कायद्या"वर सोपवून भागणार नाही. कारण असे कायदे बनविण्याचे व तोडण्याचे अधिकार बहुमताला असतात. व या बहुमताचे राजकीय भवितव्य विवेकपूर्ण धोरणाने ठरत नसते. या सर्व कारणांमुळे संसदीय लोकशाही ही राज्य समाजवाद आणण्याकरिता पोषक ठरत नाही.

यावर पर्याय काय? पर्याय हुकुमशाही हाच आहे. राज्य-समाजवादाला विकास करण्याकरिता जे स्थैर्य हवे ते. हुकुमशाही प्रदान करू शकते याबद्दल शंका नाही. परंतु हुकुमशाहीत एका गोष्टीला तोंड द्यावे लागणार. जे व्यक्तिस्वातंत्र्यावर विश्वास ठेवतात ते हुकुमशाहीचा कडाडून विरोध करतात व मुक्त समाजाकरिता संसदीय लोकशाही ही राज्यपद्धती योग्य आहे असे आग्रहाचे प्रतिपादन करतात. कारण त्यांना असे वाटते की संसदीय लोकशाहीअंतर्गतच व्यक्तीला स्वातंत्र्य लाभू शकते, हुकुमशाहीत नव्हे. त्यामुळे ज्यांना हे स्वातंत्र्य हवे आहे ते संसदीय लोकशाही ही राज्यपद्धती सोडायला तयार नाहीत.

अशा लोकांना राज्य-समाजवाद आणण्याची कितीही उत्सुकता असली तरी ते पार्लमेंटरी लोकशाहीच्या मोबदल्यात हुकुमशाही स्वीकारायला तयार नाहीत, हुकुमशाही त्यांना राज्य-समाजवाद द्यायला तयार असली तरीही या गोष्टीस ते तयार होत नाहीत. म्हणून मुद्दा असा आहे की हुकुमशाही वाचून राज्य-समाजवाद आणायचा, आणि राज्यसमाजवादासोबत संसदीय लोकशाही ठेवायची. मग याकरिता एकच मार्ग आहे तो म्हणजे संसदीय लोकशाही तर ठेवायची परंतु राज्य-समाजवाद हा संविधान-कायद्याद्वारे अंमलात आणायचा. जेणे करून राज्य समाजवादाला बदलणे, स्थगित करणे अथवा त्याचा संकोच करणे हे पार्लमेंटमधील कोणत्याही बहुमताच्या आवाक्यात राहणार नाही. याच एकमेव मार्गाने आपण तिहेरी हेतू साध्य करू शकतो तो म्हणजे राज्य समाजवादाची स्थापना, संसदीय लोकशाहीचा स्वीकार व हुकुमशाहीचा नकार.

सध्या अस्तित्वात असलेल्या संविधानापेक्षा सादर केलेली ही योजना वेगळी आहे. सध्याची संविधाने समाजाकरिता फक्त राजकीय साचा तयार करतात आणि आर्थिक शक्ती आपले बळ पणास लावून हा इमला उध्वस्त करतात. ज्यांना हुकुमशाहीवाचून समाजवाद व शिवाय संसदीय लोकशाही हवी आहे त्यांनी या योजनेचे

स्वागतच करायला हवे.

लोकशाहीचा आत्मा म्हणजे एक व्यक्ति एक मूल्य हे तत्व होय. लोकशाहीत हे तत्व अंमलात आणण्याचा प्रयत्न झाला तो राजकीय क्षेत्रात एक व्यक्ति एक मत हे तत्व अंगिकारून. एक व्यक्ती, एक मत हे तत्व वस्तुतः एक व्यक्ति- एक मूल्य ठरत असते. या तत्वामुळे जे लोक अर्थव्यवस्थेला आपल्या मर्जीप्रमाणे वाकवू शकतात त्यांच्याच तावडीत ही अर्थव्यवस्था ढकलली गेली. हे असे घडले याला कारण आहे. संविधानपटु कायदेपंडितांच्या डोक्यात अशी एक कालबाह्य संकल्पना आहे की लोकशाहीच्या संविधानाकरिता जर कोणती गोष्ट आवश्यक असेल तर ती म्हणजे संवैधानिक कायदा तयार करणे, ज्याचेमुळे सरकार लोकांना जबाबदार राहील व सरकारतर्फे लोकांवर होणाऱ्या अत्याचारांना आळा बसेल परिणामी ज्यांना आपण लोकशाही देश म्हणतो त्यांच्या एकूण एक संवैधानिक कायद्याची मजल फक्त प्रौढ मताधिकार आणि मूलभूत अधिकार इथपर्यंतच गेलेली आहे. प्रौढ मताधिकार आणि मूलभूत अधिकार यापलिकडेही लोकशाही संवैधानिक कायद्याला काही करायचे आहे इकडे कुणाचेच लक्ष नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे, जुन्या संवैधानिक कायदेपंडितांची अशी समजूत होती की समाजाला राजकीय आकार देणे हेच संवैधानिक कायद्याचे काम आहे. लोकशाहीत एक व्यक्ति एक मूल्य टिकवायचे असेल तर समाजाच्या आर्थिक जडणघडणीचे स्वरूपदेखील निश्चित करणे हेहि तेवढेच महत्वाचे आहे हे त्यांनी लक्षातच घेतले नाही. याबाबतीत आता खंबीर पाऊल उचलण्याची वेळ आली आहे. संवैधानिक कायद्याद्वारे समाजाच्या राजकीय तसेच आर्थिक जडणघडणीचे स्वरूप निश्चित करणे आवश्यक आहे. नवीन संविधान करण्याची ज्यांच्यावर पाळी आली आहे अशा भारतासारख्या सर्वच देशांनी दुसऱ्या देशांनी केलेल्या चुकांची नक्कल करू नये. जे गेलेत त्यांच्या अनुभवापासून आपण शिकायला पाहिजे.

## अनुच्छेद - २ : भाग - ३

### खंड - १

भारत सरकारच्या १९१९ आणि १९३५ च्या कायद्यातप्रांतीक व केंद्रीय कार्यकारिणी तयार करण्याकरीता सुचविलेली पद्धती ही पूर्णतः ब्रिटीश पद्धती होती, जिला संसदीय कार्यकारिणी असे संविधानपटू वकील संबोधतात. या पध्दतीच्या विरुद्ध अमेरिकन पध्दतीची कार्यकारिणी असते जिला असंसदीय कार्यकारी मंडळ असे म्हणतात. प्रश्न असा आहे की, वरील दोन कायद्यांनी स्वीकारलेली कार्यकारी मंडळाची पध्दत तशीच कायम ठेवावी की तिचा त्याग करून तिचे जागी अन्य कोणती तरी पध्दत आणायची? याबाबत कोणतेही अंतिम मत सुचविण्यापूर्वी ब्रिटीश पद्धतीच्या कार्यकारी मंडळाची खास वैशिष्ट्ये काय आहेत आणि ही पध्दती भारताला लागू केल्यानंतर तिचे

परिणाम काय होणार आहेत हे पहाणे उचित ठरेल.

ब्रिटीश अथवा संसदीय कार्यकारी मंडळ याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) ही पध्दती विधानमंडळात बहुमत मिळवलेल्या पक्षाला सरकार स्थापन करण्याचा हक्क बहाल करते.

२) जो सदस्य बहुमत पक्षाचा नाही त्याला सरकारातून वगळण्याचा अधिकार बहुमत पक्षाला देते.

३) विधानमंडळात जोपर्यंत बहुमत आहे तोपर्यंत बहुमताच्या पक्षाचे सरकार, अधिकारावर रहाते. त्या पक्षाचे बहुमत नष्ट होताच त्याच विधानमंडळात अन्य पक्षाला सरकार स्थापन करू देण्याकरता राजीनामा देते अथवा नवनिर्वाचित विधानमंडळातील बहुमत पक्षाला नवीन सरकार स्थापन करू देते.

भारताला ब्रिटीश पध्दती लागू केल्याने काय परिणाम होतील याचा आढावा थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

१) बहुमत हे राजकीय बहुमत असते, या गृहित सिध्दांतावर बहुमत पक्षाला आपले मंत्रीमंडळ बनवून सरकार चालविण्याची सोय ब्रिटीश पध्दतीत आहे परंतु भारतामध्ये बहुमत हे जातीय बहुमत आहे. इथे देशाचा कोणताही सामाजिक अथवा राजकीय कार्यक्रम असला तरी येथील बहुमताचे स्वरूप जातीय राहील. कोणतीही गोष्ट यात बदल करू शकत नाही.ही वस्तुस्थिती लक्षात घेतली आणि ब्रिटीश पध्दतीचे अनुकरण इथे केले तर येथील जातीय बहुमताला कार्यकारी मंडळाचे अधिकार कायमचे प्राप्त झाल्याचे दृष्य आपणाला दिसेल.

२) ब्रिटीश पध्दतीच्या सरकारमध्ये बहुमत पक्षावर आपल्या मंत्रीमंडळात अल्पसंख्य पक्षाचा प्रतिनिधी घेण्याचे बंधन नाही सबब ही पध्दती भारतात लागू केली तर परिणाम उघड आहे. या पध्दतीत बहुसंख्य जात ही सत्ताधिकारी राहील, आणि अल्पसंख्य जात ही नेहमी तिच्या आधीन (a subject race)राहील. याचा अर्थ असा की बहुसंख्यांक जात अल्पसंख्यांकांचे हित कशात आहे, याबद्दलच्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणे संपूर्ण प्रशासन चालवण्यास मुक्त राहील. अशा प्रकारच्या राज्य व्यवस्थेला लोकशाही म्हणता येणार नाही. तिला साम्राज्यशाहीच म्हणावे लागेल.

अशा प्रकारचे परिणाम लक्षात घेतल्यास हे स्पष्ट आहे की, ब्रिटीश पध्दतीची कार्यकारिणी निव्वळ अस्पृश्यांनाच नव्हे तर सर्व अल्पसंख्य जमातीच्या जीवित, स्वातंत्र्य आणि सुखप्राप्तीच्या साधनांकरता पूर्णतः जाचक ठरणारी आहे.

अस्पृश्यतेचा प्रश्न अस्पृश्यांसमोर सतत आ वासून उभा आहे. अस्पृश्य हे हिंदू लोकसंख्येने, जी त्यांचेबद्दल पूर्णतः सहानुभूतीशून्य आहे, सर्व बाजूंनी वेढलेले आहेत इतकेच नव्हे तर कोणत्याही प्रकारचा अन्याय व अत्याचार करण्यास हिंदूंना मुळीदेखील लाज वाटत नाही. या दैनंदिन अन्यायाचे निराकरण करण्यासाठी अस्पृश्यांना प्रशासनाची

मदत घ्यावी लागते. परंतु या प्रशासनाचे स्वरूप कसे आहे, आणि त्यातील व्यक्ती कशा आहेत? थोडक्यात सांगायचे तर भारतातील प्रशासन हे पूर्णतः हिंदूंच्या हातात आहे त्यांचीच ही मक्तेदारी आहे. वरपासून खालपर्यंत सर्वत्र सत्ता त्यांच्याच हातात आहे. असे खाते नाही जेथे त्यांचे आधिपत्य नाही. पोलीस, न्यायदंडाधिकारी आणि महसूल सेवा यात त्यांचेच वर्चस्व आहे. इतकेच नव्हे तर त्यांचे प्राबल्य नाही अशी प्रशासनाची कोणतीही शाखा त्यांच्या तावडीतून सुटलेली नाही. दुसरा मुद्दा लक्षात घेण्यासारखा असा आहे की अस्पृश्यांसंबंधी प्रशासनबाह्य व्यक्तीस जी द्वेष आणि सूडबुद्धी असते तीच प्रशासनातील हिंदूंमध्येही असते. हिंदूंचे एकच उद्दिष्ट एवढेच नव्हे तर अत्याचार आणि दडपणापासून मिळणाऱ्या कायदेशीर संरक्षणापासून देखील त्यांना वंचित करणे. याचा परिणाम असा झाला आहे की, एकीकडे हिंदू लोकसंख्या, जी त्यांच्यावर अत्याचार करीत आहे आणि दुसरीकडे हिंदूमय प्रशासन जे पीडित अस्पृश्यांना मदत करण्या ऐवजी गुन्हेगारांना संरक्षण देत आहे, अशा कात्रीत अस्पृश्य समाज सापडलेला आहे.

या पार्श्वभूमीवर अस्पृश्यांना स्वराज्याचा अर्थ काय हे कळून चुकले आहे. आज फक्त प्रशासन तेवढे हिंदूंच्या हातात आहे. उद्या स्वराज्यात विधानमंडळ आणि कार्यकारी मंडळ ही दोन्ही हिंदूंच्या हाती जाणार. अशा स्वराज्यात अस्पृश्यांचे जास्त हाल होतील हे सांगण्याची गरज नाही. कारण सहानुभूतीशून्य प्रशासनाशिवाय बेफिकीर विधानमंडळ आणि बेजबाबदार कार्यकारिणी स्वराज्यात अस्तित्वात येईल. याचे परिणाम स्पष्ट आहेत. निरंकुश प्रशासनावर विधान मंडळाचा आणि कार्यकारी मंडळाचा मुळीदेखील वचक रहाणार नाही. त्यामुळे ते (प्रशासन) पूर्ण त्वेषाने व द्वेषाने पूर्वीप्रमाणेच अन्याय करीत राहील. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे अस्पृश्यांच्या वाट्याला हिंदू धर्मामुळे आलेलेअधःपतन कायम राहील आणि त्यातून सुटका करून घेण्याचा कोणताही मार्ग राहणार नाही.

ब्रिटीश पध्दतीची कार्यकारिणी प्रस्थापित करण्याविरुद्ध अशा काही खास बाबी आहेत ज्यांचा उगंम अस्पृश्य आणि अल्पसंख्य यांच्या हितसंबंधांशी निगडित आहे. परंतु अशीही एक सामान्य बाब आहे जी सर्वांना लागू पडते. ब्रिटीश मंत्रीमंडळ पध्दतीने ब्रिटीश लोकांना एक स्थिर सरकार दिलेले आहे, याबद्दल मुळीच शंका नाही. प्रश्न असा आहे की ही पद्धती भारतात स्थिर सरकार देऊ शकेल काय? मला ही शक्यता अंधुक वाटते. जाती जातीतील व पंथापंथातील भांडणामुळे या देशात अनेक राजकीय पक्ष व गट निर्माण होतील व हीच परिस्थिती विधानमंडळातही राहील. असे झाले तर ! तर इंग्लंडमध्ये संसदीय कार्यकारिणी असल्यामुळे ज्याप्रमाणे बहुमत विरोधात गेल्याबरोबर मंत्रीमंडळाला राजीनामा द्यावा लागतो व तसे भारतात झाले तर येथील सरकार नेहमी अस्थिर राहील. कारण एखाद्या गटाला अगदी बारीक सारीक क्षुल्लक कारणांकरीता वारंवार पक्षांतर करता येऊन सरकारचा पाडाव करणे सहज शक्य आहे. ज्यांना आपण प्रमुख पक्ष म्हणतो, त्यांच्यात असलेला एकोपा फार काळ टिकणार नाही. आज ज्यामुळे हे प्रमुख

पक्ष बांधलेले आहेत ते बंधन भारतातील इंग्रज राजवटीचा प्रश्न सुटताक्षणी गळून पडेल आणि वारंवार सरकार बदलणे म्हणजेच अनागोंदी कारभाराला निमंत्रण देणे होय. सध्याच्या घटनेत सेक्शन ९३ आहे जे अशा परिस्थितीत एक उपाय सुचवते. परंतु स्वतंत्र भारताच्या संविधानात हा भाग (सेक्शन) असणार नाही. म्हणून या भागाकरता दुसरा कोणता तरी उपाय शोधून काढणे आवश्यक आहे.

या सर्व बाबींचा साकल्याने विचार केला असतां, ब्रिटिश पद्धतीची कार्यकारणी देशाला पूर्णतः अयोग्य आहे.

या खंडाअंतर्गत सुचविलेले मंत्रीमंडळाचे स्वरूप खालील उद्दीष्टे साध्य करते.

(अ) अल्पसंख्यांकांना आपले म्हणणे मांडण्याची संधी न देता सरकार तयार करण्यास बहुमत पक्षाला प्रतिबंध करते.

(आ) प्रशासनावर संपूर्ण अधिसत्ता प्रस्थापित होताच बहुसंख्यांकांमार्फत अल्पसंख्यांकांवर अत्याचार करण्यापासून बहुसंख्य लोकांना या खंडाद्वारे प्रतिबंध करते.

(इ) ज्यांचेवर अल्पसंख्यांकांचा विश्वास नाही अशा अल्पसंख्यांक जातीच्या प्रतिनिधींना बहुमत पक्षाच्या मंत्रीमंडळात समाविष्ट करण्यास प्रतिबंध करते.

(ई) उत्तम आणि कार्यक्षम प्रशासनाकरिता आवश्यक असणाऱ्या स्थिर मंत्रीमंडळाची निर्मिती करते.

अमेरीकन मंत्रीमंडळाच्या धर्तीवर या खंडाची रचना केलेली आहे. आणि भारतातील परिस्थितीशी मुख्यता अल्पसंख्यांक समाज लक्षात घेऊन याची रचना केलेली आहे. या तरतूदींत सुचविलेले मंत्रीमंडळाचे स्वरूप, जबाबदार सरकारच्या तत्वाशी विसंगत आहे या मुद्यावर या सूचनेस आक्षेप घेता येणार नाही. इंग्लीश पद्धतीच्या मंत्रीमंडळाशी परिचीत असलेली भारतीय मंडळी ही बाब विसरतात की लोकशाही व जबाबदार सरकार यांचे करीता मंत्रीमंडळाची तीच एकमेव पद्धती नाही. अमेरीकन पद्धती देखील तितकीच चांगली लोकशाही प्रधान आणि जबाबदार राज्यपद्धती आहे. एखादी व्यक्ती निव्वळ विधानमंडळात निवडून आली एवढ्याने ती मंत्री होण्याच्या लायकीची ठरू शकत नाही, या सुचनेत देखील आक्षेपार्ह काहीच नाही. विधानमंडळाचा सदस्य मंत्री होण्यापूर्वी त्याच्या विभागाने निवडून द्यावा हे तत्व ब्रिटिश संविधानाने १०० वर्षापूर्वी स्वीकारले आहे. पार्लमेंटचा सदस्य जो मंत्री म्हणून नेमण्यात आला त्याला मंत्रीपद स्वीकारण्यापूर्वी लोकांकडून निवडून यावे लागते. ही प्रथा अगदी अलीकडे बंद झाली. म्हणून या सूचना जबाबदार सरकारच्या तत्वाशी विसंगत आहेत, या सबबीवर आक्षेप घेण्याचे काहीही प्रयोजन नाही. वस्तुतः ही (माझी) सूचना अमेरीकन पद्धतीची सुधारलेली आवृत्ती आहे कारण या पद्धतींत मंत्रीमंडळाचे सदस्य विधान मंडळात बसू शकतात आणि त्यांना बोलण्याचा आणि प्रश्नांची उत्तरे देण्याचा अधिकार राहील.

### खंड – २

यातील योजना वादग्रस्त ठरण्याचे कारण नाही. बहुसंख्यांकांचे अल्पसंख्यांकांवर जे अत्याचार आणि जुलूम होतात त्या विरुद्ध सर्वोत्तम उपाय म्हणजे चौकशी, प्रसिद्धी आणि चर्चा होय. या खंडाद्वारे हीच सोय केलेली आहे. अशाच तऱ्हेची सूचना सप्रू कमिटीने देखील सुचविलेली होती.

### खंड – ३

सामाजिक बहिष्कार ही अस्पृश्यांच्या डोक्यावरील सपृश्य हिंदूंनी ठेवलेली कायमची टांगती तलवार आहे. बहिष्काराचे शस्त्र किती जाचक असते हे फक्त अस्पृश्यच जाणू शकतात. मुंबई सरकारने १९२८ साली मागासवर्गीयांच्या तक्रारींची चौकशी करण्यांकरिता नेमलेल्या एका कमिटीने आपल्या रिपोर्टात या बहिष्काराचे स्वरूप व परिणाम यांचे सविस्तर वर्णन केलेले आहे. त्यातील काही भाग खाली दिलेला आहे. यावरून बहिष्काराचे स्वरूप स्पष्ट होईल, आणि हिंदूंना अस्पृश्यांवर अत्याचार करण्याचे हे शस्त्र किती अमोघ आहे याची सहज कल्पना येईल. समिती म्हणते,

"मागासवर्गीयांना सार्वजनिक स्थानांचा निर्धास्तपणे उपयोग करता यावा म्हणून नानातऱ्हेचे उपाय आम्ही सुचविले असले तरी त्यांचा प्रत्यक्ष लाभ घेतांना असंख्य अडचणी बऱ्याच काळपर्यंत येण्याचा संभव आम्हांला दिसतो. पहिली अडचण अशी की सनातनी वर्ग हे त्यांचेवर उघडपणे हल्ले करतील अशी भीती आहे. आपण ही बाब लक्षांत ध्यायला पाहिजे की प्रत्येक गावात अस्पृश्य (डिप्रेस्ड क्लासेस हा शब्द या ठिकाणी अस्पृश्यांना उद्देशून वापरलेला आहे.) हा एक लहानसा अल्पसंख्य घटक आहे. व त्यांचे विरुद्ध खूप मोठी संख्या असलेला सनातनी वर्ग आहे, जो स्वतःचे हित आणि प्रतिष्ठा राखण्याच्या निमित्ताने अस्पृश्यांच्या तथाकथीत अधिकारातीक्रमणास कोणत्याही मार्गाने दडपून टाकायला सदैव तयार असतो. अशा उघड आक्रमणांवर पोलिसांतर्फे कारवाई होण्याची भीती थोडी फार असल्यामुळे याला तात्पुरता पायबंद बसलेला आहे व अशा उघड हल्ल्याच्या घटना अल्प आहेत.

"दुसरी अडचण ही अस्पृश्यांची सध्याची जी आर्थिक स्थिती आहे त्यातून उद्‌भवलेली आहे. मुंबई इलाख्यात बहुतेक भागात अस्पृश्य हे आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी नाहीत. काही अस्पृश्य सनातनी स्पृश्य वर्गांच्या जमिनी कुळ म्हणून मालकाची मर्जी सांभाळून वाहत असतात. इतर काही अस्पृश्य स्पृश्यांच्या शेतावर मजूर म्हणून कामाला असतात. व आणखी इतर लोक गावकामगार म्हणून काम करून स्पृश्य हिंदूंची सेवा करताना जे अन्नधान्य त्यांचेकडून मिळेल त्यावर गुजराण करतात. आमच्या कानी अशा अनेक घटना आल्यात ज्यात अस्पृश्यांनी जेव्हा आपल्या अधिकाराचा वापर करण्याचे धैर्य दाखवले तेव्हां स्पृश्य हिंदूंनी त्यांचे विरुद्ध आर्थिक नाकेबंदी केली आणि त्यांना त्यांच्या

जमिनीतून हुसकून लावले, त्यांना नोकरीवरून कमी केले आणि त्यांना गावकीच्या सेवेचे वेतनही बंद केले. हे बहिष्काराचं तंत्र इतक्या व्यापक प्रमाणात अंमलात येते की अस्पृश्यांना सार्वजनिक वाटा देखील रहदारीस बंद करण्यात येतात आणि गावचा बनिया दुकानदार दैनंदीन जीवनाच्या वस्तू देखील त्यांना नाकारतो. पुराव्या वरून असे दिसून आले आहे की, अस्पृश्यांविरुद्ध सामाजिक बहिष्कार पुकारण्यासाठी लहानसहान कारण देखील पुरेसे असते. अस्पृश्यांनी सार्वजनिक विहीरीचा वापर केला तर साधारणपणे बहिष्कार टाकण्यात येतो. परंतु निव्वळ जानवे टाकले अथवा एखाद्या जमिनीचा तुकडा खरेदी केला अथवा नवीन कपडे अथवा दागिने अंगावर टाकले किंवा घोड्यावरून नवरदेवाची वरात काढली इत्यादी क्षुल्लक बाबींवरून देखील कडक बहिष्कार टाकण्यात आल्याची उदाहरणे थोडी थोडकी नाहीत."

हा वृत्तांत १९२८ चा. तो काळ आता मागे पडला अशी चुकीची समजूत होण्याचा संभव आहे म्हणून मी खाली अस्पृश्यांचे एक निवेदन सादर करीत आहे. पंजाबातील खेरी जेसोर या गावच्या अस्पृश्यांनी रोहटक जिल्ह्याच्या डेप्युटी कमिशनरला १९४७ च्या फेब्रुवारी महिन्यात एक अर्ज दिला व त्याची प्रत मला पाठवली. त्या अर्जात म्हटले आहे.

"अनुसूचित जातीचे लोक (चांभार) रहाणार खेरीजेसोर, तहसिल व जिल्हा-रोहटक. यांचेकडून,
डेप्युटी कमीशनर
रोहटक, जिल्हा– रोहटक, यास,

महोदय,

आम्ही खेरीजेसोर येथे राहणारे खालील (चांभार) अनुसूचित जातीचे लोक आमच्या दुर्दशेकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. आमच्या गावातील स्पृश्य जाट हिंदू यांनी आमच्यावर चालवलेल्या अकारण दडपणामुळे व निर्दयी वागणूकीमुळें ही दशा आम्हाला प्राप्त झालेली आहे.

चार महिन्यापूर्वी गावातील सर्व जाट हे चावडीवर जमा झाले आणि त्यांनी आम्हाला सांगितले की, आम्ही त्यांचे शेतात काम करावे व त्या मोबदल्यात फक्त एक पेंडी धान्य मिळेल जिचेपासून आम्हाला प्रत्येक माणसाला दररोज फक्त एक शेर धान्य पडेल. यापूर्वी आम्हाला दोन्ही वेळच्या अन्ना शिवाय धान्याची पेंडी आणि आठ आणे मजूरी मिळत असे. या नवीन दंडकामुळे आमचे पोट देखील पुरेसे भरणे शक्य नव्हते, म्हणून आम्ही काम करण्यास नकार दिला. यावर सर्व गावकरी क्रोधाने संतप्त झाले व त्यांनी आमचेवर सामाजिक बहिष्कार पुकारला. त्यांनी असा नियम केला की, आमची जनावरे जंगलात चारायला जाऊ दिली जाणार नाहीत, आणि जर चारायचीच असतील तर आम्ही "पूछी" नांवाचा कर द्यायला पाहिजे. हा काही सरकारी कर नव्हे. गावकरी आमच्या जनावरांना गावातील तलावातून पाणीदेखील पीऊ देत नाहीत तसेच भंग्यांना आमच्या वस्तीतील सडका झाडण्यास देखील मनाई केलेली आहे. परिणामी सर्व रस्त्यांवर

केराचे आणि घाणीचे मोठे ढिग साचले असून जर ते उचलले गेले नाहीत तर रोगराई पसरण्याचा संभव आहे. आम्हांला अतिशय शरमेचे जीणे जगावे लागत आहे. ते आम्हाला नेहमी मारहाण करतात तसेच आमच्या बायका, आयाबहीणी आणि मुलींसमोर असभ्य वर्तन करतात. अतिशय निघृण अशा अत्याचारांना आम्हाला तोंड द्यावे लागत आहे. शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना देखील त्यांनी अतिशय निर्दयपणे मारहाण केलेली आहे.

आम्ही तुम्हाला वरील सर्व घटनांचा वृत्तांत कथन करणारा अर्ज मागेच दिला परंतु अजूनपर्यंत त्यावर काहीही कारवाई झालेली नाही असे खेदाने म्हणावेसे वाटते.

याबाबतीत आम्ही ज्या पोलीस इन्स्पेक्टर व रोहटकच्या तहसिलदाराकडे निवेदन दिले, त्यांनी अतिशय बेपवाईने चौकशीचे सोंग केले आणि आम्हाला असे वाटते की, आमच्या गरीब व भोळ्या लोकांच्या अडचणी दूर करण्याकरता त्यांनी मुळीच लक्ष दिलेले नाही हे आम्ही आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

म्हणून आम्ही आपणांस विनंति करतो की, याची दखल घेऊन आपण ताबडतोब जाट लोकांकडून निरनिराळ्या प्रकारच्या होणाऱ्या क्रूर अत्याचारांना व धमक्यांना थोपविण्यासाठी काही तरी व्यवस्था करावी. आम्हाला अन्य कोणता मार्ग नसल्यामुळे आम्ही आपले दार ठोठावले आहे आणि आम्हाला आशा आहे की, आपण ताबडतोब कारवाई करून आम्हांला सन्मानाने व शांततेने जगण्यास संधी द्यावी, जो मानवाचा जन्मसिद्ध अधिकार आहे.

आपले आज्ञाधारक

सेवक,
अनुसुचित जातीचे लोक (चांभार)
राहाणार, खेरी जेसोर,
रोहटक, जि.– रोहटक.
अंगठा

प्रतिलिपी
बी. आर. आंबेडकर,
वेस्टर्न कोर्ट,
नवी दिल्ली.

१ फेब्रुवारी १९४७ रोजी मिळाले.

या अर्जावरून हे स्पष्ट होईल की १९२८ साली जी परिस्थिती होती तीच आज आहे. जे मुंबईच्या बाबतीत सत्य आहे तेच संपूर्ण भारताला लागू आहे. गेल्या प्रांतिक विधानमंडळाच्या निवडणूकीचे वेळी संपूर्ण भारतात ठिकठिकाणी हिंदूंनी अस्पृश्यांविरुद्ध जे बहिष्काराचे अस्त्र वापरले, त्या घटनांकडे लक्ष दिले, तरी या म्हणण्याची सत्यता पटेल.

म्हणून जेव्हा "बहिष्कार" हा फौजदारी गुन्हा ठरेल तेव्हाच हिंदूंच्या गुलामगिरीतून अस्पृश्यांची सुटका होईल.

अस्पृश्यांच्या व्यतिरिक्त अन्य जातीच्या विरोधात देखील हे बहिष्काराचे शस्त्र अलिकडे वापरात येऊ लागले आहे. म्हणून सर्व छोट्या जातीजमातीसाठी हे संरक्षण आवश्यक आहे.

यातील बहिष्कारासंबंधीची तरतूद "बर्मा अँटी बायकॉट ॲक्ट १९२२"च्या कायद्यातून सरसकट उचललेली आहे.

**खंड : ४**

अशी तरतूद भारत सरकार कायदा १९३५ कलम १५० मध्ये समाविष्ट केलेलीच आहे.

**Article II Section IV**

**अनुच्छेद : २ भाग चार**

**Part — 1 Clause — 1**

**विभाग – १ खंड – १**

या खंडात काही नवीन नाही. विधान मंडळातील प्रतिनिधीत्वाचा अधिकार पुणे कराराने मान्य केलेलाच आहे. फक्त जे मुद्दे विचारात घ्यायचे राहिले आहेत ते म्हणजे, १) प्रतिनिधीत्वाचे प्रमाण २) झुकते माप (वेटेज) आणि ३) मतदान पद्धती.

**१) प्रमाण (Quantum)**

पुणे कराराद्वारे अस्पृश्यांना जे प्रतिनिधीत्वाचे प्रमाण देण्यात आले आहे ते कराराच्या खंड १ मध्ये नमूद आहे. हे प्रमाण १) इतर जातींचा हिस्सा वेगळा काढून ठेवल्यानंतर २) इतर जातींना त्यांचे झुकते माप पूर्ण दिल्यानंतर आणि ३) खास हितसंबंध असलेल्यांना काही जागा दिल्यानंतर,उरलेल्या जागांचा विचार करून ठरवलेल्या आहेत. झुकत्या मापाच्या जागा काढल्यामुळे आणि खास हितसंबंधियांना जागा दिल्यामुळे अस्पृश्यांचे नुकसान झालेले आहे. या जागांचा वाटा पुणे कराराच्या कितीतरी पूर्वी जातीय निवाड्याने अस्पृश्यांना दिला होता. त्यामुळे त्यावेळी हा अन्याय निवारण करणे शक्य नव्हते.

**२) झुकते माप (Weightage)**

अस्पृश्यांना सहन करावा लागणारा आणखी एक अन्याय आहे. "झुकते माप" पद्धतीत मिळणाऱ्या वाट्याचा अस्पृश्यांना मिळालेल्या अधिकारात होणाऱ्या अन्यायाशी संबंध आहे.

'झुकते माप' मिळण्याच्या प्रश्नाने दुहेरी स्वरूपाचा वाद निर्माण झाल्याचे आपल्या

लक्षात येईल. एकीकडे बहुसंख्य आणि अल्पसंख्य यांच्यात वादंग माजले आहे तर दुसरीकडे विभिन्न अल्पसंख्य जातीतच वाद निर्माण झालेला आहे.

बहुसंख्य आणि अल्पसंख्यांकांचा वाद हा पहिल्या प्रथम मापाच्या तत्वासंबंधी आहे. बहुसंख्यांकांचे म्हणणे असे की अल्पसंख्य जमातीच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधीत्वाचा अल्पसंख्य जमातीस अधिकार नाही. बहुसंख्य समाजाने या नियमाचा एवढा आग्रह कां धरावा हे कळत नाही. बहुसंख्य जातीला लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रतिनिधीत्व मिळवून असे सिद्ध करावयाचे आहे काय, की ते कायमचे बहुसंख्य राहतील आणि बहुसंख्य म्हणूनच कार्य करतील? किंवा अल्पसंख्यांकांना झुकते माप देऊनही त्यांनी कायमचे अल्पमतांत राहावे आणि बहुसंख्यांकांनी त्यांच्यावर सतत आपले मत लादावे जे मत अल्पसंख्यांकांना बदलता येऊ नये असे तर बहुसंख्यांकांचे मत नसेल? "बहुमताचे राज्य" या संकल्पनेशी पहिलामुद्दा विसंगत आहे. 'बहुमताचे राज्य' याचा अर्थ आपण व्यवस्थित समजून घेण्याचा प्रयत्न केला तर तो असा होईल की बहुमतवाल्यांनी निर्णय घेतल्यास त्यांचेशी अल्पमतवाल्यांनी जुळवून घ्यायचे. मला वाटते बहुसंख्यांकांचा असा हेतू राहणे शक्य नाही. वरीलपैकी दुसराच मुद्दा बहुसंख्य लोकांना अभिप्रेत आहे असे समजायला हरकत नाही. अल्पसंख्य जातींना झुकत्या मापाचे तत्व लागू करून देखील त्या अल्पमतातच राहतील हे आपण मान्य करायला पाहिजे. जातीय बहुमत असलेला पक्ष आपण कायमचा बहुमत पक्ष आहो असे समजतो व राजकीय बहुमत नसतांना देखील राजकीय सवलती सतत उपभोगीत असतो. हे मान्य केलें तरी पराभवात देखील तरतम भेद करायला हवाच. संपूर्ण धुव्वा उडणे वेगळे आणि हातातोंडाशी आलेला विजय निसटल्यामुळे हार पत्करणे वेगळे. काही धावांनी पराभूत होणे, काही गडी राखून हार खाणे, आणि पूर्ण डावाने पराभव होणे यात किती फरक आहे याची क्रिकेटच्या जाणकारास चांगली जाणीव आहे. थोड्याफार धावांनी सामना हरल्यास फारसे दुःख होत नाही. परंतु पूर्ण डावाचा पराभव पदरी पडल्यास नैराश्य पसरते. अशा प्रकारचे नैराश्य एखाद्या अल्पसंख्य जमातीच्या राजकीय जीवनात वाट्याला आले तर त्या अल्पसंख्य जमातीचे नैतिक बळ तर खच्ची होतेच परंतु त्यांचेतील स्वत्व व स्वाभिमान देखील दडपला जातो. ते कोणत्याही परिस्थितीत होऊ देऊ नये. हा मुद्दा लक्षात घेतल्यास बहुसंख्यांकांनी हेका धरलेला लोकसंख्येच्या प्रमाणातील प्रतिनिधीत्वाचा नियम हा घातक आहे यात शंका नाही. अल्पसंख्यांकांना जर कशाची गरज असेल तर त्यांना वाढीव प्रतिनिधीत्वाची गरज नसून प्रभावी प्रतिनिधीत्वाची गरज आहे.

आणि प्रभावी प्रतिनिधित्व म्हणजे तरी काय? बहुमताद्वारे आपण दडपले जाणार नाही एवढे प्रतिनिधीत्वाचे संख्याबळ प्रभावी प्रतिनिधीत्व निर्माण करण्यास कारणीभूत ठरते. एका अल्पसंख्य जातीला अथवा अनेक जातीच्या एकत्र लोकसंख्येला एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेसे प्रतिनिधीत्व मिळाले तर ते देखील प्रभावी प्रतिनिधीत्व ठरू

शकेल. परंतु अल्पसंख्य जातींच्या लोकसंख्येचे प्रमाण हा निकष त्या जातीच्या प्रतिनिधीत्वाचा वाटा ठरविण्याकरता लवचिक नसेल तर अल्पसंख्यांक जात किंवा जाती प्रभावी प्रतिनिधीत्व प्राप्त करू शकणार नाहीत. अशा तऱ्हेचा लवचिक नसलेला 'लोकसंख्या – प्रमाण-प्रतिनिधीत्वा'चा निकष लावण्याचा आग्रह धरणे म्हणजे अल्पसंख्यांकांच्या संरक्षणाची चेष्टा करणे होय. अल्पसंख्य जमाती करता प्रतिनिधीत्वाचा अधिकार हा न्याय्य आहे, ही त्यांना संरक्षण देण्यामागची भूमिका मान्य करण्यात आली. आहे. अशा परिस्थितीत ''झुकते मापा'चे तत्व म्हणजे बहुसंख्य लोकांच्या वाट्याला आलेल्या प्रतिनिधीत्वातील वाटा कमी करून अल्पसंख्यांकांना वाटून देणे हे आवश्यक ठरते आणि जर बहुसंख्य समाज प्रामाणिक आणि न्यायप्रिय असेल तर त्यांनी ही मागणी मान्य करायला पाहिजे. म्हणून झुकत्या मापाच्या तत्वासंबंधी भांडण होण्याचे काहीही कारण नाही. एकदा हे मान्य केले की, वादाचा मुद्दा फक्त एकच राहतो की, हे झुकते माप कसे ठरवायचे. अर्थात हा प्रश्न तत्वाचा नसून जुळवून घेण्याचा आहे.

म्हणून झुकत्या मापाच्या तत्वाला कोणताही आक्षेप येऊ शकत नाही. झुकत्या मापाची मागणी सर्वच अल्पसंख्य समाजांची सर्वसाधारण मागणी असून जेथे बहुसंख्यांक समाज खूप मोठा आहे तेथे अस्पृश्यांना इतर अल्पसंख्य समाजा सोबत ही मागणी रेटणे भाग आहे. सध्याच्या झुकत्या मापात विभिन्न अल्पसंख्य जातींमध्ये जागांचे वाटप विषम आहे, म्हणून ही व्यवस्था चूक आहे. सध्या काही अल्पसंख्य जातींना सिंहाचा वाटा मिळालेला आहे तर अस्पृश्यांसारख्या जातींना काहीच मिळालेले नाही. म्हणून झुकत्या मापाचे तत्व काही बौद्धिक निकषावर लागू करून अस्पृश्यांवरील अन्याय दूर करणे भाग आहे.

### ३) मतदासंघ (Electorates)

१) अनुसूचित जातींच्या जागांची निवडणूक पद्धति पुणे कराराच्या खंड २ ते ४ मध्ये निर्दिष्ट केलेली आहे. या पद्धतिनुसार दोन निवडणुका घ्यायच्या आहे. १) प्राथमिक निवडणुका आणि २) अंतिम निवडणुक. अनुसूचित जातींच्या विभक्त मतदारसंघाद्वारे प्राथमिक निवडणुका होतील. अनुसूचित जातींकरिता राखून ठेवलेल्या जागेवर अंतिम निवडणुकीत उभे राहण्यास कोण पात्र आहे हे प्राथमिक निवडणुकीद्वारे ठरते. अंतिम निवडणुक संयुक्त मतदारसंघाद्वारे होते जीत स्पृश्य हिंदु आणि अस्पृश्य मतदान करतात आणि त्यांच्या एकत्र मतदानातून अंतिम निकाल ठरत असतो.

२) पुणे कराराच्या खंड ५ द्वारे प्राथमिक निवडणूक पद्धति फक्त १० वर्षांकरिताच मर्यादित आहे. याचा अर्थ असा की १९४७ नंतर होणाऱ्या निवडणुका संयुक्त मतदारसंघ व राखीव जागांद्वारे सरळसरळ होतील.

३) जरी हिंदूंनी ही दहा वर्षांची मुदत वाढविण्याचा प्रयत्न केला तरी अनुसूचित जाती संतुष्ट होणार नाहीत. प्राथमिक निवडणुका चालू ठेवण्यास दोन आक्षेप आहेत. पहिला आक्षेप असा की, या प्राथमिक निवडणुका अस्पृश्यांना स्वतःचा सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी

निवडून आणण्यास मुळीच उपयोगाच्या नाहीत. सोबत दिलेल्या परिशिष्ट ३ वरून दिसून येईल की प्राथमिक निवडणुकीत सर्वाधिक मते मिळवणारा अस्पृश्यांचा उमेदवार अंतिम निवडणुकीत मात्र पडतो तसेच प्राथमिक निवडणुकीत कमी मते पडलेला अस्पृश्य उमेदवार अंतिम निवडणुकीत सर्वाधिक मते मिळवतो. दुसरा आक्षेप असा की, प्राथमिक निवडणुक ही वस्तुस्थिती निदर्शक नाही. गेल्या निवडणुकीत अस्पृश्यांच्या १५१ राखीव जागांपैकी फक्त ४३ जागांकरिताच प्राथमिक निवडणुका झाल्यात. याचे कारण असे की अस्पृश्यांना प्राथमिक व अंतिम अशा दोन्ही निवडणुकांचा खर्च सोसणे शक्य होत नाही. अशी ही निवडणुक पद्धति कुचकामी आहे.

४) राखीव जागांसहित एकत्र मतदारसंघ ही पद्धति जी पुणे करारातील अटींमुळे अंमलात येणार आहे ही वरील पद्धतिपेक्षा जास्त वाईट ठरणार आहे. हा काही अंदाज वा कल्पना नाही. मागील निवडणुकांनी हे निर्विवादपणे सिद्ध केले की अस्पृश्य लोक संयुक्त मतदारसंघात पूर्णतः नामशेष होतील. परिशिष्ट ३ मधील आकडेवारीवरून दिसून येईल की अस्पृश्य उमेदवार स्पृश्यांच्या मतांवर निवडून आलेत. एवढेच नव्हे तर हे अस्पृश्य उमेदवार प्राथमिक निवडणुकात सपशेल पडलें होते तरी त्यांना हिंदुंनी निवडून आणले. हा तर अस्पृश्यांचा मताधिकार उध्वस्त करणारां प्रकार आहे. (Disfranchisement) याचे प्रमुख कारण म्हणजे अनेक मतदारससंघात स्पृश्य व अस्पृश्य मतदारांच्या संख्येत असलेली प्रचंड तफावत. परिशिष्ट ३ मधील आकडेवारीवरून हे लक्षात येईल. सायमन कमिशनने म्हटले आहे की एखाद्या मतदारसंघातील संरक्षित समाज संख्येने खूपच अत्यल्प असेल तर राखीव जागेचा उपाय व्यवहारात निरुपयोगी ठरतो. हीच गोष्ट अस्पृश्यांचे बाबतींत घडलेली आहे. ही तफावत दुर्लक्षून चालणार नाही. प्रौढ मतदारपद्धतीतही ही राहणार आहे. अशी परिस्थिती असल्यामुळें, अस्पृश्यांचे खरे प्रतिनिधी निवडून आणण्याचे दृष्टीने निर्दोष पद्धति शोधून काढणे आवश्यक आहे.

या पद्धतीत —

१) अतिशय खर्चिक व अनावश्यक असलेली प्राथमिक निवडणुक नष्ट करणे आणि

२) स्वतंत्र मतदारसंघाचा पर्याय नाहीसा करणे, या दोन बाबी समाविष्ट राहतील

५) ज्या प्रश्नांनी स्पृश्य हिंदु आणि अनुसूचित जाती यांच्यामध्ये राजकीय जीवनात कडवटपणा आलेला आहे त्यापैकी मतदारसंघ ही एक बाब आहे. अनुसूचित जाती स्वतंत्र मतदार संघाचा आग्रह धरीत आहेत तर हिंदु समाजाचा त्याला तेवढाच प्रखर विरोध आहे. जर याबाबतीत समझोता करायचा असेल आणि अशा समझोत्यावाचून स्पृश्यास्पृश्यात शांतता व सद्‌भाव राहणे शक्य नसेल, तर आपणास हे ठरवावे लागेल की कोण बरोबर आहे व कोण चूक आहे, आणि या प्रश्नावर होणारा विरोध हा बौध्दिक पातळीवरील आहे की निव्वळ पूर्वग्रहदूषित भूमिकेतून करण्यात येत आहे.

६) अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीला विरोध करताना

सर्वसाधारणपणे खालील मुद्दे मांडण्यात येतातः—

१) अनुसूचित जाती या अल्पसंख्यांक नाहीत.
२) अस्पृश्य हे हिंदुच आहेत त्यामुळे स्वतंत्र मतदारसंघ त्यांना देता येणार नाहीत.
३) स्वतंत्र मतदारसंघामुळे अस्पृश्यता कायम राहील.
४) स्वतंत्र मतदारसंघाची मागणी अराष्ट्रीय आहे.
५) स्वतंत्र मतदारसंघामुळे, ब्रिटीश साम्राज्यशाहीला स्वतंत्र मतदारसंघ असलेल्या जातीवर दडपण आणून राष्ट्रविरोधी कृत्ये करवून घेता येतात.

७) हे मुद्दे योग्य आहेत काय?

एक) अस्पृश्य हे अल्पसंख्यांक नाहीत असे म्हणणे म्हणजे "अल्पसंख्य" या शब्दाचा अर्थच समजला नाही असे म्हणावे लागेल. वेगळ्या धर्माचा असणे एवढ्या एकाच निकषावर "अल्पसंख्य" समाज ठरत नाही आणि हा निकष देखील बरोबर अथवा चांगला नाही. एखादा समाजघटक अल्पसंख्य आहे की नाही हे त्याला त्याच्या समाजाकडून कितपत पक्षपाती वागणूक मिळते यावर त्या समाजाचे "अल्पसंख्यत्व" ठरवायला हवे. धार्मिक वेगळेपणापेक्षा हाच निकष तर्कशुध्द व व्यवहार्य म्हणून स्वीकारावा असे श्रीमान गांधींनीही मान्य केलेले आहे. "हरिजन"च्या दि. २१ ऑक्टोबर १९३९ च्या अंकांत, "दि फिक्शन ऑफ ए मेजॉरिटी" या शीर्षकाखाली लिहिलेल्या अग्रलेखात, अस्पृश्य हेच "एकमेव खऱ्या अर्थाने" अल्पसंख्य आहेत असे मत त्यांनी मांडलेले आहे.

दोन) अस्पृश्य हे हिंदु आहेत म्हणून त्यांनी स्वतंत्र मतदारसंघ मागू नये असे म्हणणे म्हणजे वरील मुद्दा वेगळ्या पध्दतीने मांडणे होय. संवैधानिक संरक्षक तरतुदींकरिता धर्मनिष्ठेचा निकष लावणे बरोबर नाही. धर्मनिष्ठादेखील सामाजिक विभक्तपणा आणि पक्षपाती वागणूक यातून निर्माण झालेली असते, ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाही. धार्मिक विभक्तपणाशी विभक्त मतदारसंघाचा संबंध आहे असा समज कां निर्माण झाला? तर ज्यांना विभक्त मतदारसंघ मिळालेत ते समाज अनायासे धार्मिकदृष्ट्या अल्पसंख्य होते. परंतु धार्मिकतेची बाब ही विभक्तमतदारसंघ देण्यास कारणीभूत ठरलेली नाही. मुसलमानांना विभक्त मतदारसंघ देण्यात आलेत ते काही ते "इस्लाम" धर्माचे आहेत म्हणून नव्हे,तर हिंदू आणि मुसलमान यांचेतील सामाजिक संबंध दुराव्याचे आहेत म्हणून. थोडे वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे मतदारसंघाचा प्रकार हा काही धार्मिक निकषावर ठरत नसतो, तो ठरतो सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन. मतदारसंघाचे स्वरूप हे धार्मिक निष्ठेवर ठरवल्या जात नसून सामाजिक संबंधावर ठरविले जाते ही गोष्ट भारत सरकारच्या १९३५ च्या कायद्यात खिस्ती समाजासंबंधी केलेल्या तरतुदींवरूनदेखील स्पष्ट ध्यानात येईल. भारतातील खिस्ती समाज युरोपियन, अँग्लोइंडियन्स व भारतीय खिश्चन अशा तीन समाजात विभागलेला आहे. हे सर्व गट जरी धर्माने खिस्ती असले तरी प्रत्येक गटाला वेगवेगळे विभक्त मतदारसंघ दिलेले आहेत. यावरून हे स्पष्ट होईल की धार्मिक

निष्ठा हा मतदारसंघाचा निकष नसून सामाजिक विभक्तपणा हाच निर्णायक मुद्दा आहे.

तीन) विभक्त मतदारसंघामुळे स्पृश्य व अस्पृश्य समाजातील एकात्मता भंग पावते असे म्हणणे गोंधळलेल्या मनःस्थितीचे लक्षण आहे. निवडणुका ५ वर्षातून एकदा होतील. समजा संयुक्तमतदारसंघ आहेत. तरी निवडणुकीसाठी फक्त एक दिवस एकत्र आल्याने स्पृश्य व अस्पृश्यांत एकात्मता कशी निर्माण होईल हे कळत नाही. कारण वर्षाचे उरलेले ३६४ दिवस त्यांचे जीवन विभक्त व स्वतंत्र असते. तसेच वर्षभर वेगळे राहणारे हे दोन समाज फक्त एक दिवस निवडणुकीत भाग घेतल्याने विभक्त मतदारसंघ असल्यास, कायमचे अलग कसे होणार हे कळणे कठीण आहे. याउलट असे विचारता येईल की, ज्यांना या दोन समाजात एकोपा निर्माण करण्यासाठी कार्य करायचे आहे त्यांना या समाजांनी एक दिवस वेगळे मतदान केल्यामुळे कार्य करण्यास कशी काय बाधा निर्माण होणार? सरळसरळ विचारायचे झाल्यास, अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघ मिळाल्याने स्पृश्यास्पृश्यात होऊ घातलेल्या सहभोजन व मिश्रविवाहास आडकाठी कशी येणार? अस्पृश्यांच्या विभक्त मतदारसंघाने अस्पृश्य व स्पृश्य हिंदू यांचेत कायमची दरी निर्माण होईल हे म्हणणे फोल आहे ही गोष्ट वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

चार) विभक्त मतदारसंघामुळे राष्ट्रविरोधी भावना निर्माण होतात हे म्हणणे अनुभवसिध्द नाही. शीखांना विभक्त मतदारसंघ आहेत परंतु ते अराष्ट्रीय आहेत असे कोणी म्हणत नाहीत. मुसलमानांना १९०९ पासून स्वतंत्र मतदारसंघ आहेत. मिस्टर जीना हे अशाच विभक्त मतदारसंघातून निवडून आलेले आहेत आणि तरीही १९३५ पर्यंत ते भारतीय राष्ट्रवादाचे कट्टर पुरस्कर्ते होते. इंडियन खिश्चन यांना देखील विभक्त मतदारसंघ आहेत. तरीही त्यांचेपैकी बहुसंख्य लोकांनी काँग्रेसशी जुळवून घेतले आहे. (त्यांचेपैकी कोणीही काँग्रेसच्या तिकीटावर निवडून आला नाही ही बाब वेगळी) मतदारसंघाच्या स्वरूपावर कुणाचीही राष्ट्रीयता वा अराष्ट्रीयता ठरत नसते हे उघड आहे. राष्ट्रनिष्ठा ही अन्य बाबींवर ठरत असते.

पाच) या मुद्यात काहीच दम नाही. ही निव्वळ पळवाट आहे. काहीही असो, स्वतंत्र भारतात विभक्त मतदारसंघाच्या विरोधात असे आक्षेप आपोआप नाहीसे होतील.

८) विभक्त मतदारसंघाच्या विरोधकांचे युक्तिवाद तर्क आणि अनुभवाच्या कठोर परीक्षेत का उतरत नाही याला एक कारण आहे ते म्हणजे विरोधकांचा या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टीकोन मूलतःच चुकीचा आहे. ही चूक दोन प्रकारची आहे.

एक) मतदारसंघाच्या प्रकाराचा धर्मबंधनाशी अथवा जातीबंधनाशी काहीही संबंध नाही ही बाब हे लोक विसरतात. मतदारसंघ ही एक यंत्रणा आहे, जिच्याद्वारे अल्पसंख्यांकांना आपला खरा प्रतिनिधी विधानमंडळात निवडून

आणता येतो. याव्यतिरिक्त मतदारसंघाचा अन्य कोणताच हेतू नसतो. ही अल्पसंख्य समाजाच्या संरक्षणाची यंत्रणा असल्यामुळे ती संयुक्त असावी वा विभक्त असावी हे ठरविण्याचे काम अल्पसंख्य समाजाकडेच सोपवले जाणे स्वाभाविक आहे.

दोन) बहुसंख्य समाजाने विभक्त मतदार संघ मागणे व हीच मागणी अल्पसंख्य समाजाने करणे यातील फरक हे लोक लक्षात घेत नाहीत. बहुसंख्य समाजास विभक्त मतदारसंघ मागण्याचा अधिकारच नाही. कारण अगदी सोपे आहे. बहुसंख्य समाजाला विभक्त मतदारसंघाचा अधिकार देणे म्हणजेच अल्पसंख्य समाजाच्या संमतीवाचून बहुसंख्य समाजाचे सरकार अल्पसंख्यांकांच्या डोक्यावर लादणे होय. ही गोष्ट लोकशाहीच्या सर्वमान्य सिध्दान्ताशी विसंगत आहे. ज्यांचेवर राज्य करायचे त्यांच्या संमतीने राज्य चालवणे म्हणजे लोकशाही होय. उलटपक्षी अल्पसंख्य समाजास स्वतःचे हिताचे दृष्टीने मतदारसंघ निवडण्याची संधी दिली तर कोणतीही आपत्ती ओढवणार नाही. कारण अल्पसंख्य समाज बहुसंख्यांकावर राज्य करेल हे सुतराम संभवनीय नाही.

९) या पूर्ण प्रश्नाकडे पाहण्याचा रास्त दृष्टीकोन खालील बाबींवर विसंबून आहेः—

एक) अल्पसंख्यांकांच्या हक्काच्या संरक्षणाकरिता मतदारसंघाची पद्धती अंमलात आलेली आहे. त्यामुळे मतदारप्रणाली विभक्त हवी की संयुक्त, हे पूर्णतः अल्पसंख्यांकाच्या मर्जीवर सोपवावे. जर मतदारसंघ बहुसंख्यांकावर प्रभाव गाजवण्याइतपत विशाल असेल तर अल्पसंख्य समाज संयुक्त मतदारसंघ निवडेल. व जर तो लहान असेल तर स्वतःची अस्मिता विलीन होऊ नये म्हणून तो विभक्त मतदारसंघ स्वीकारील.

दोन) बहुसंख्यांक जाती अधिकारपदावर येणारच. त्यामुळे मतदारसंघाची पध्दती ठरविण्याच्या प्रश्नात त्यांना विचारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जर अल्पसंख्यांकांना संयुक्त मतदारसंघ हवा असेल तर बहुसंख्यांकांनी त्याला स्वीकारलेच पाहिजे. जर अल्पसंख्यांकांनी त्यांचेकरिता विभक्त मतदारसंघ हवा असे ठरवले तर बहुसंख्यांक त्याला नाकारू शकत नाहीत. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, अल्पसंख्य कोणता निर्णय घेतात हे बहुसंख्यांकांनी पहात राहावे व त्याप्रमाणे त्याचे पालन करावे.

## विभाग - १ (Part - I)

### खंड - २ (Clause - 2)

पुणे करारात या मागणीची तरतूद नाही, सबब ही मागणी पुणे करारबाह्य आहे असे वाटेल. परंतु हे बरोबर नाही. खरे पाहता, पुणे करारात अशी तरतूद करण्यात आली

नाही कारण तसे करण्याची गरजच वाटली नाही. याची कारणे दोन आहेतः—
१) पहिले कारण असे की, ज्यावेळी पुणे करार करण्यात आला त्यावेळी कोणत्याही जमातीकरिता मंत्रीमंडळात कायद्याने विशिष्ट प्रमाणात प्रतिनिधित्व निश्चित केलेले नव्हते. २) दुसरे कारण म्हणजे मंत्रीमंडळात जातीजमातींचे प्रतिनिधित्व किती असावे हे पूर्वीपासून चालत आलेल्या प्रथेप्रमाणे ठरत असे व गव्हर्नर आपल्या सूचना-पत्रकानुसार ही प्रथा पाळण्यात येते की नाही यावर लक्ष ठेवी. अनुभव असा आहे की, मंत्रीमंडळात अस्पृश्यांचे विशिष्ट प्रमाण आज निश्चित करणे अगत्याचे ठरले आहे.

### विभाग - १ : खंड - ३

ही काही नवीन मागणी नाही. सरकारी नोकऱ्यात (पब्लिक सर्व्हिस) अस्पृश्यांना पुणे कराराने योग्य प्रतिनिधित्व निश्चित केलेले आहे परंतु प्रतिनिधीत्वाचे प्रमाण मात्र ठरलेले नाही. भारत सरकारने ही मागणी न्याय्य असल्याचे कबूल केले आहे आणि प्रतिनिधीत्वाचे प्रमाणदेखील ठरविलेले आहे आता करण्यासारखी कोणती गोष्ट असेल तर या मागणीला कायद्याचे स्वरूप देणे.

## विभाग — २ : खंड — १

ही मागणीही नवीन मागणी नाही. पुणे कराराच्या खंड ९ अन्वये अस्पृश्यांच्या शिक्षणाकरिता पुरेशी रक्कम काढून ठेवावी असे ठरलेले आहे. परंतु रकमेचे प्रमाण ठरलेले नाही. ही मागणी जर काही करत असेल तर ती म्हणजे राज्य शासनाने किती प्रमाणात हा बोजा स्वीकारावा हे निश्चित करते. या बाबतीत भारत सरकार कायदा १९३५ च्या सेक्शन ८३ कडे पहावे. यात अँग्लोइंडियन व युरोपियन यांच्या शिक्षणाची (सरकारद्वारे) तरतूद आहे तसेच अलिगढ मुस्लिम विद्यापीठ आणि बनारस हिंदु विद्यापीठे यांना केंद्र सरकारतर्फे अनुदान देण्यात येते.

### विभाग - २ : खंड - २

ही नवीन मागणी आहे. परंतु विशिष्ट परिस्थितीत समर्थनीय आहे. आज हिंदुसमाज खेडेगावात राहतो आणि अस्पृश्य समाज हा गावकुशीतील झोपडीत राहतो (बाबासाहेबांनी "घेट्टो" हा शब्द वापरला आहे. अमेरिकेतील निग्रो ज्या वस्त्यातून राहतो त्याला घेट्टो म्हणतात) या मागणीचा हेतू हिंदूंच्या गुलामीतून अस्पृश्यांची मुक्तता करणे हा आहे. सद्यःस्थिती अशीच कायम राहिली तर हिंदूंच्या गुलामीचे जू मानेवरून झुगारणे अथवा अस्पृश्यतेच्या शृंखला तोडून फेकणे अस्पृश्यांना अशक्य होईल. हिंदु आणि अस्पृश्य एकाच गावात राहिल्यामुळे त्यांचेत परस्परसंबंध निर्माण झाले. या

